# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. ०४/१२/२०१५**

आज शुक्रवार दि. ०४/१२/२०१५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०८ दि. २३/१२/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | जैन गिता भरत | महापौर |
| २) | प्रविण मोरेश्वर पाटील | उपमहापौर |
| ३) | केळुसकर प्रशांत नारायण | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ५) | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ६) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ७) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ८) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ९) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| १०) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| ११) | मयेकर सरस्वती रजनीकांत | सदस्या |
| १२) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १३) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १४) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १५) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १६) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १७) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १८) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १९) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २०) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २१) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २२) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २३) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २४) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २५) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २६) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २७) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| २८) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| २९) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३०) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३१) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३२) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३३) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३४) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३५) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ३६) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ३७) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ३८) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ३९) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४०) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४१) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४२) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ४३) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४४) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४५) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४६) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ४७) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ४८) | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | सदस्या |
| ४९) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५०) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५१) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५२) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५३) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ५४) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ५५) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ५६) | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | सदस्या |
| ५७) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ५८) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ५९) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ६०) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६१) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६२) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६४) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ६५) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६६) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ६७) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ६८) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ६९) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ७०) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७१) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ७२) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७३) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७४) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ७५) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७६) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ७७) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ७८) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ७९) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८०) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| ८१) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |
| ८२) | हेमंत म्हात्रे | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ३) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| ४) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ५) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ६) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ७) | मेहता नरेंद्र लालचंद | सदस्य |
| ८) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| ९) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| १०) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ११) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज –**

| | | |
|---|---|---|
| १) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |

३) मेंन्डोंसा स्टिवन जॉन सदस्य
४) रॉड्रीक्स मॉरस जोसेफ सदस्य
५) डॉ. नयना मनोज वसानी सदस्या

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सोमवार दि. १८/०१/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०९, दि. ०७/०१/२०१६ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**मुन्ना सिंग :-**

वाकोडे साहेब कहाँ है।

**मा. महापौर :-**

इन लोगो का सत्कार होने के बाद उनको बूलाते है।

**रोहिदास पाटील :-**

सामान्य कुटुंबातून वर जाणाऱ्या किंवा संधी प्राप्त होणाऱ्या ह्या साध्या कुटुंबातील विद्यार्थ्यांचे नागरिकांचे हे जे यश आहे ते अत्यंत अवलोकनिय आहे. आपल्याला त्याचा अभिमान आहे. सभागृहाला विनंती आहे मा. महापौरांना विनंती आहे की, आपल्या नियमानुसार जे जास्तीत जास्त म्हणजे त्यांनी परदेशात जाण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न करावा म्हणून आपल्या नियमात बसेल असे आर्थिक सहाय्य त्यांना करावे असा मी ठराव मांडतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सभा चालू व्हायच्या आधी अर्धा तास टी ब्रेक देते.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, माझी विनंती आहे माझा प्रश्न आज झाला पाहिजे. मला वेळ मिळाला पाहिजे नाही तर पूढची सभा मी चालवू देणार नाही.

**मा. महापौर :-**

सचिवांनी सभेला सुरुवात करा.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेकरिता प्रशासनाकडून अनुसूची २ के खाली दोन प्रस्ताव आले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

प्रस्ताव आधी पाठवा. सदस्यांना वाचू द्या. आम्हाला पटल्यानंतर आम्ही त्याची मंजूरी देऊ. मा. महापौर मॅडम, सभा कामकाज चालू होण्याच्या आधी माझी एक विनंती आहे. वारंवार विनंती करत आलो परत एकदा करणार सन्मा. सभागृहाच्या समोर करणार. सभागृहामध्ये ७-८ मुस्लीम बांधव सदस्य आहेत. शुक्रवार असल्यामुळे नमाजाची वारंवार तुमच्याकडे विनंती केलेली आहे की, शुक्रवारी सभा बोलवू नका ही सभा तुम्हाला उद्या बोलवता आली असती ह्या देशामध्ये एवढा मोठा मुद्दा चालू असताना ह्या देशाच्या संविधानिक अधिकाऱ्याच्या स्थानिक लोकसभेमध्ये सातत्याने चर्चा चालू आहे हे सर्व काही ह्या देशामध्ये चालू असताना आपण जाणूनबुजून ह्या शहरामध्ये वातावरण निर्माण करताय का? मी तुम्हाला ह्या सभागृहाच्या समोर विनंती करेन आज तुम्ही सभा बोलावली आम्हाला येण मान्य आहे. आम्हाला मान ठेवावा लागेल. मात्र मी तुम्हाला विनंती करेन शुक्रवारी सभा बोलवू नका. ही सभा उद्या बोलावता आली असती. आता १२ वाजले १.०० वाजता सभा तहकूब करायला लागेल. जेवणाची सुट्टी द्यायला लागेल कारण आम्हाला नमाजाला जायला लागेल आम्हाला यायला २.३० ते ३.०० वाजतात. तेवढा वेळ वाया जातो. मेहेरबानी करुन ह्या विषयावर पुढच्यावेळी............

**अशरफ शेख :-**

मॅडम वजह क्या है आप क्यों रखते हो। मुझे एक शेर याद आ रहा है तो आप सुन लिजिए। बेखूदी बेसबब नही है गालिफ कुछ तो है जिसकी परदादारी है।

**मा. महापौर :-**

सचिव साहेब प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करा.

**जुबेर इनामदार :-**

आमचा परत पुन्हा तोच प्रश्न असणार ...............

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, माझा विषय होऊ द्या मग तुमचे चालू करा. ८-९ महिने झाले हा महत्वाचा विषय असून देखील हे तुमचे विषय महासभा चालू झाल्यानंतर घ्या. प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी .............
(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

महासभा अधिनियमाचा भाग आहे. ते कशाप्रमाणे चालले पाहिजे ते सचिवांनी स्पष्ट करावे.

**नगरसचिव :-**

उपविधीप्रमाणे प्रश्नोत्तर तास अर्धा तास चालला पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

उपविधीप्रमाणे अर्धा तास चालला पाहिजे ह्याचा अर्थ सभा कामकाज उपविधीप्रमाणे चालेल.

**नगरसचिव :-**

उपविधीमध्येच काम चालेल.

**जुबेर इनामदार :-**

सभा कामकाज उपविधीप्रमाणे चालले पाहिजे हा नियम आहे.

**नगरसचिव :-**

हो उपविधीप्रमाणे चालले पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

ह्याचा अर्थ आपली जी उपविधी आहे. प्रारुप नाही. त्याला मंजूरी आहे ती मान्य आहे.

**नगरसचिव :-**

ती प्रारुप आहे.

**जुबेर इनामदार :-**

ती मान्य आहे.

**नगरसचिव :-**

मान्य आहे ना.

**जुबेर इनामदार :-**

मान्य आहे म्हणून सभा कामकाजच्या पध्दतीने चालेल.

**नगरसचिव :-**

हो चालेल.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब परत परत विषय बदलू नका.

**नगरसचिव :-**

उपविधीप्रमाणे काम चालेल.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब तुम्ही सर्वात जेष्ठ ह्या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये आहात. तुम्ही अनुभवी आहात. तुम्ही तुमची बाजू स्पष्ट मांडा. सभा कामकाज उपविधीप्रमाणेच चालेल.

**नगरसचिव :-**

सभा कामकाज उपविधीप्रमाणेच चालेल.

**जुबेर इनामदार :-**

प्रारुप उपविधी मंजूर उपविधी आहे.

**नगरसचिव :-**

सभा कामकाज मंजूर उपविधीप्रमाणेच चालेल.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब प्रश्नोत्तराला सुरुवात करा.

**नगरसचिव :-**

१२ वाजून ०५ मिनिट झाली आहेत. सौ. निलम ढवण ह्यांचा प्रश्न आहे.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम धन्यवाद. तसेच सर्व सहकार्याचे मनपुर्वक आभार की ७ ते ८ महिन्यांनी ह्या विषयावर बोलायची संधी दिलेली आहे. मॅडम फेरिवाला संदर्भात माझा प्रश्न होता त्या प्रश्ना संदर्भात मी काही प्रश्न विचारु इच्छिते त्याची उत्तरे मला दिली जावीत. त्यानुसार आमच्याही काय शंका असतील तर आमच्या शंका निरसन केले जातील अशी अपेक्षा करते. फेरीवाल्याचा प्रश्नानी मिरा भाईंदर शहराला फार मोठा विळखा घातलेला आहे. वेळोवेळी ह्या संदर्भात आवाज उठवून देखील प्रभाग समिती असू दे ह्या विषयावर सगळीकडे कारवाई करण्यासंदर्भात आणि ह्या फेरिवाल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या रस्त्यावरुन लहान मुलांना व जेष्ठ नागरिकांना संध्याकाळच्या वेळी चालणे मुश्कील झालेले आहे. नवघर रोड, बी.पी. रोड ह्या ठिकाणी मी स्वतः बघितलेले आहे की तिथे बऱ्याच वेळेला ॲक्सीडंट देखील झालेला आहे. जिवित हानी देखील झालेली आहे. एवढ असून देखील तिथल्या फेरिवाल्यावर म्हणावी तशी कारवाई केली जात नाही. किंबहुना महिन्यातून एखाद वेळी कारवाई केली जाते त्याचे कारण काय.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आपले संपूर्ण प्रश्न विचारा मी एकदाच उत्तर देतो.

**निलम ढवण :-**

त्यानंतर फेरिवाला क्षेत्रामध्ये वसूलीसाठी ठेकेदार नेमताना नियमाप्रमाणे अनामत रक्कम पालिका घेते किंवा नाही? घेत असल्यास किती व कशी घेतली जाते. साहेब त्या संदर्भात कोण असेल ना?

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

मी आपल्याला उत्तर सांगतो आपले टोटल चार प्रश्न आहेत. पहिला बाजार फी वसूलीबाबत ठेकेदारांमार्फत बाजार फी किती वसूल केली जाते प्रती चौ. २५ रु. त्याप्रमाणे वसूल करतो आणि दोन चौ.मी. असेल तर ५० रु. वसूल करतो. हा एक पहिला प्रश्न होता. मा. स्थायी समिती ठरावाप्रमाणे वसूल करतो. आपला दुसरा प्रश्न आहे महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरापेक्षा ठेकेदारांनी जास्त फी वसूल केल्यास महानगरपालिका प्रशासन कसे कळविते तक्रार जरी प्राप्त झाली तक्रार आपण पडताळतो. त्याला करारनाम्यानुसार १०००/- दंड करतो. आपला तिसरा प्रश्न ज्या ठिकाणाहून किंवा बाजार ठेकेदार बाजार फी वसूल करत आहेत तेथे महानगरपालिकेने दराबाबत सुचनाफलक लावले आहे. ना फेरिवाला क्षेत्रात बाजार फी वसूल करु नये. ह्या अटीवर ठेकेदारास ठेका देण्यात आला आहे. मग ना फेरिवाला क्षेत्रातून बाजार फी वसूल करणाऱ्या ठेकेदारावर आजपर्यंत कोणती कारवाई करण्यात आली आहे असा प्रश्न आहे. जवळपास वेळोवेळी आपण ना फेरिवाला क्षेत्रात कोण ठेकेदार वसुल करत असेल त्यांना नोटिस दिलेली आहे. सत्यता पडताळून दंडात्मक कारवाई सुध्दा केलेली आहे. सध्या चार ठेकेदार नेमलेले आहेत त्याच्यामध्ये भाईंदर (प.) जाहिर बोली लिलावाद्वारे के.एम. चेलूसकर ह्यांना दिलेला ठेका १५ पैकी इसारा रक्कम घेऊन १ कोटी ५८ लाखाला ठेका दिलेला आहे. दुसरा मुर्धा ते उत्तन किरण जुबेर ह्यांना दिलेला आहे. इसारा रक्कम १ लाख ५३ हजार घेतलेले आहे. १५ टक्के ठेका त्याची रक्कम १० लाख २२ हजार आहे. तिसरा मिरारोड ते चेना जाहिर बोली लिलावाने दिलेले आहे. अनिल कादरोडकरला २ कोटी १७ लाखाला दिलेला आहे. भाईंदर (पूर्व) सिटी जावेद अब्बास राजा ह्यांना दिलेला आहे. ते २८ लाख ७२ हजारला आपण घेतलेले आहे. त्याच्यात एकूण वार्षिक रक्कम १ कोटी ९१ लाख आहे.

**निलम ढवण :-**

रक्कम किती घेतली.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

१ कोटी ९१ लाख.

**निलम ढवण :-**

आणि घ्यायची किती आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

ही वर्क ऑर्डर बोलीवर दिली.

**निलम ढवण :-**

त्यांनी आपल्याकडे अनामत रक्कम किती जमा केली.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

अनामत रक्कम १५ टक्के आणि आपण पोस्ट डेटेड चेक घेतले सहा महिन्याचे.

**निलम ढवण :-**

ते चेक नंतर वटतील का?

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

नाही वटले तर त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल होईल.

**निलम ढवण :-**

साहेब ह्याच्यापूर्वी बऱ्याच ठेकेदारानी वसूली केली आहे जेवढी पालिकेला भरायला पाहिजे होती तेवढी रक्कम पालिकेला जमा झाली नाही त्या ठेकेदाराबद्दल...............

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

काळ्या यादीत टाकले आहे त्याच्यावर फौजदारी गुन्हा पण दाखल केलेला आहे.

**निलम ढवण :-**

साहेब ठेकेदाराला म्हणजे कंपनीला काळ्या यादीत टाकले जातात. परंतु ठेकेदार दुसरी कंपनी बोलून तोच ठेकेदार आपला ठेका घेतो.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

जी कंपनी रजिस्टर आहे.

**प्रमोद सामंत :-**

कंपनी नाही ते इन्डीविज्यूअल आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

होना त्यांना केले ना मग.

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही इन्डीविज्यूअल ठेका देता. कंपनीला ठेका दिलेला नाही त्याचे काय चेक करतात.

**मा. महापौर :-**

प्रमोद सामंत साहेब ज्यांचा प्रश्न आहे त्यांचे संपू द्या.

**निलम ढवण :-**

ठेकेदारावर ज्याच्यावर कारवाई केली जाते काळ्या यादीत टाकले जातात. ब-याच वेळा सर्वच क्षेत्रातील ठेकेदार दुसरी कंपनी करुन तोच ठेकेदार परत चालवत असतो.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

त्याला आपण काही करु शकत नाही.

**निलम ढवण :-**

त्याच्यामागे कोणाची कंपनी आहे ते व्हेरीफाय करत नाही का.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

ज्यांनी ठेका घेतलेला आहे त्याची रजिस्टरला नोंद आहे. त्याला आपण काळ्या यादीत टाकले आहे. त्याच्यावर दंडात्मक कारवाई सुध्दा केलेली आहे. आणि फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे.

**निलम ढवण :-**

कारवाई चालू आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

चालू आहे.

**सुहास रकवी :-**

मा. महापौर मॅडम, त्याच्या.................

**मा. महापौर :-**

आपण बसा त्याचे संपू द्या.

**सुहास रकवी :-**

ते उत्तर देतात त्याच विषया संदर्भित आम्ही बोलतो.

**मा. महापौर :-**

त्यांना बसू द्या मग बोला.

**सुहास रकवी :-**

फक्त कंपनी नसताना त्यांनी वैयक्तिक दिले त्यांची सिक्युरिटी काय तुमच्याकडे त्याचे तुम्ही अॅग्रीमेंट ठेवले की काय ठेवले आणि पानपट्टे साहेब चुकीची माहिती देतात तुम्ही मीटरप्रमाणे नोंद करता २५ रु. मिटर एखादी हातगाडी मिटरच्या पेक्षा जास्त असते. दिड मीटर म्हणून जो फेरिवाला धंदा करतो त्याला ५० ते ७५ रुपयाची पावती दिली जाते.

**निलम ढवण :-**

रकवी साहेब तो विषय आहे.

**मा. महापौर :-**

त्यांचा क्वेशन आहे शी इज रेडी फॉर दॅट.

**सुहास रकवी :-**

मला नंतर बोलायला संधी द्या.

**निलम ढवण :-**

साहेब ह्या ठेकेदाराकडून बॅक गॅरेन्टी किंवा त्यांची शुअरिटी म्हणून जे काही आहे ते घेतल जाते का?

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

बॅक गॅरेन्टी घेतली जाते.

**निलम ढवण :-**

सगळे पेपर वर्क केले जाते का?

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

हो केले जाते.

**निलम ढवण :-**

गेल्यावर्षी प्रत्येक प्रभागातून किती वसूली केली गेली? आणि ह्या वर्षी त्याच्यात किती वाढ झाली अमाऊन्ट मिळू शकेल.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

एवढी अमाऊन्ट आम्ही काढलेली नाही.

**निलम ढवण :-**

ठीक आहे मला नंतर देण्यात यावी.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

देतो.

**निलम ढवण :-**

मागील वर्षी जे ठेकेदार काळ्या यादीत टाकले आहेत त्याचे मला लेखी देण्यात यावे. दुसरी गोष्ट ह्या फेरिवाल्याचा जो प्रश्न आहे पहिल्यापासून तिथे जे फेरिवाले बसत होते आता तर प्रत्येक एरियात ते भाईंदर पूर्व असो भाईंदर पश्चिम असो मिरारोड असो वेळोवेळी फेरिवाल्याची संख्या वाढत चालली आहे. त्याच्यावर प्रशासनाचे निर्बंध काय आहेत. तिथे सध्या फेरिवाल्याचे दलाल कार्यरत आहेत. दिवसाचे भाडे घेऊन ती गाडी

लावली जाते आणि त्यांना दलालामार्फत ही शुअरिटी दिली जाते की तुम्ही गाडी लावा. जर ती उचलली गेली तर ती परत आणून द्यायच काम आमचे आहे. अशा पध्दतीने दलालाचे काम चालू आहे. त्यामुळे मिरा भाईंदर शहराचे फार मोठ्या प्रमाणात विद्रूपीकरण चालू आहे. आमच्या नवघर पट्टयाला तो पूर्ण स्टेशनपर्यंत रस्ता फेरिवाल्याच्या गाडीने भरलेला असतो पण त्याच्यावर कारवाई का केली जात नाही हा मूळ प्रश्न आहे. साहेब त्या फेरिवाल्यावर कारवाई का केली जात नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

सन्मा. सदस्यांना काय कारवाई केली ते सांगू इच्छितो जानेवारी ते ऑक्टोबर पर्यंत काय कारवाई केली आतापर्यंत जवळपास हातगाडी, लोखंडी बाकडे, लोखंडी स्टॅन्ड, लाकडी बाकडे, प्लायवूड, प्लास्टिक बाक, छत्री इ. असे जवळपास ४० ॲटम आहेत. जानेवारी ते ऑक्टोबर पर्यंत ११ हजार ६८६,८६ टाईपच्या वस्तू जमा केलेल्या आहेत त्यांना दंडात्मक कारवाई सुध्दा केलेली आहे. चार पथक निर्माण केलेली आहेत. प्रभाग १ व २ साठी पथक आहे ३ व ४ साठी पण पथक आहे. ५ साठी एक वेगळे पथक आणि ६ साठी वेगळे पथक आहे. त्यासाठी ५ मजूर ४ सुरक्षा रक्षक आहेत. आपण वेळोवेळी कारवाई करतो.

**निलम ढवण :-**

आहे पण आमच्या प्रभागामध्ये ३ व ४ मध्ये आपण जे बघतो बी.पी. रोड, नवघर रोडला कारवाई केली जात नाही. गाड्या घेऊन जातात गाड्या समोर उभ्या करतात त्यांना कोणाचा तरी फोन जातो. तात्पुरते गल्लीबोळात उभी करतात. परत त्या गाड्या बाहेर येतात गल्लीत त्याच वेळी गाडी टाकायची झाली आमच्याकडे किंवा कोणाच्याही प्रायव्हेट गाड्या जायच्या झाल्या तर जाऊ शकत नाही का तर फेरिवाल्याच्या गाड्या तिथे उभ्या असतात. साहेब हा विषय फार मोठा आणि गंभीर आहे. वेळोवेळी प्रभाग समितीच्या मिटींगमध्ये देखील ह्या विषयावर आम्ही आवाज उठवतो परंतु तिथे आवाज उठवून तेवढ्यापूरतच मर्यादेत राहतो. कुठच्याही विषयावर कारवाई केली जात नाही. त्यामुळे सभागृहात सर्वांच्या वतीने सांगू इच्छिते की, आमचाही वेळ ह्याच्यात वाया जातो. प्रभाग समितीच्या आणि महासभेच्या मिटींग अटेन्ड करुन नगरसेवकांचा वेळ वाया जातो जर कारवाई होत नसतील तर आम्ही आमचा पूर्ण वेळ आम्ही वाया घालवतो असे आम्हाला वाटायला लागले आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

मी सभागृहाला आश्वासन देतो की स्पेसिफिक पुढच्या आठवड्यामध्ये बी.पी. रोड, नवघर रोडला स्पेशल कारवाई पोलिसांच्या माध्यमातून केली जाईल.

(सभागृहात गोंधळ)

**सुहास रकवी :-**

आता हे म्हणतात फेरिवाल्यांच अतिक्रमण त्या मॅक्सेस मॉलच्या मागे एका रात्रीमध्ये किती मोठा बाजार भरलेला. तुम्हाला पोलिस स्टेशनमध्ये ................

**शरद पाटील :-**

मॅडम परवानगी शिवाय बोलायला देऊ नका.

**सुहास रकवी :-**

अधिकारी बरोबर उत्तर देत नाही.

**मा. महापौर :-**

आपल्याला परवानगी दिली नाही आपण बसून जा.

**शरद पाटील :-**

मॅडम, परवानगीशिवाय कोणाला बोलायला देऊ नका.

**मा. महापौर :-**

आणि बोलले तर ते प्रोसिडिंगमध्ये येणार नाही.

**शरद पाटील :-**

साहेब परवानगी सोडा पण चूकीची माहिती देतात त्याचे काय.

(सभागृहात गोंधळ)

**सुहास रकवी :-**

आमच्या वॉर्डमध्ये तुम्ही बघा.

**मा. महापौर :-**

परवानगी शिवाय बोलतील त्याचे रेकॉर्डवर घेतले जाणार नाही.

**निलम ढवण :-**

साहेब त्या ठिकाणी कारवाई करताना देखील ते कर्मचारी सांगतात ह्या ठिकाणी दोन दिवस करतो त्या ठिकाणी दोन दिवस करतो. वेस्टला दोन दिवस, मिरारोडला दोन दिवस, २-२ दिवस असे विभागले गेले तर तिथे १५ दिवसांनी किंवा महिन्यानी परत येतात. ते सांगतात जे फेरिवाले असतात ते हल्ला करतात त्यांना सिक्युरिटी काही नाही. ह्या सगळ्याचा गांर्भियपूर्वक विचार का केला जात नाही. तिथे रोजच्या रोज कारवाई झाली पाहिजे. २-२ दिवसाने म्हणजे १५ दिवसाने कारवाई होते त्यामुळे फेरिवाल्याची मुजोरी वाढली आहे की ते काही कर्मचा-यांवर हल्ला करतात. एवढी मुजोरी का वाढली त्यांना फोन करुन कसे निरोप दिले जातात.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

यापूढे दररोज कारवाई हाती घेतो. ह्यासाठी परमनन्ट सोल्यूशनसाठी नॅशनल हॉकर्स पॉलिसीनुसार त्याचे सर्व्हेक्षण करणार आहोत. मध्यंतरी समिती स्थापण्याचा विषय आणला होता. हॉकर्स समिती संदर्भात निविदा काढली होती पण शासनाने त्या निविदेचे रेट्स जास्त असल्यामुळे नाकारले आहे. नॅशनल मिशन माध्यमातून ते पैसे ..................

**निलम ढवण :-**

साहेब त्याच्यावर आपण दुसरा पर्याय करु शकतो. माझा हा २०१३ चा प्रश्न आहे. २०१३ चा प्रश्न असल्यानंतर आजपर्यंत किंवा मी नगरसेवक झाल्यानंतर ३ वर्ष उलटून गेली आहेत. त्यानंतर फेरिवाल्याचा प्रश्न प्रत्येक सदस्य उचलतात तर त्यासाठी प्रशासनाने आजपर्यंत योग्य तोडगा का काढला नाही. मार्केट आरक्षण एवढी आहेत, मार्केटसाठी एवढा रिर्झव्ह फंड ठेवला जातो. त्याचा वापर कुठे होतो त्याच गांर्भियपूर्वक विचार का केला जात नाही तिथे मार्केट बांधण्यासाठी १० वेळा पाठपुरावा केला आहे. आमदाराच्या फंडातून एवढीशी खोली आणि त्याचा वापर दुसराच कोणीतरी करतो. तिथे प्रायोरिटी बेसीसवर मार्केट का बांधले जात नाही. म्हणजे जे शहराला पाहिजे त्याच्यावर प्रशासनाने लक्ष कमी आहे. ज्या आवश्यक गोष्टी आहेत त्याच्यावर नक्कीच कमी आहे असे दिसून येते. बाकीची मोठमोठी टेंडर निघू शकतात. मग ह्या आवश्यक गोष्टी का होऊ शकत नाही. साहेब ह्याचा गांर्भियपूर्वक विचार करावा.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

मार्केट बांधणे आवश्यक आहे.

**निलम ढवण :-**

मी १० वेळा फेऱ्या मारते.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

त्याची प्रोसिजर पण चालू आहे. फेरिवाल्याचा एवढा गांर्भियाचा विषय असताना ते बांधल गेल पाहिजे होत. तीन वर्ष त्याच्यासाठी फंड नाही त्याच्यावर गांर्भियपूर्वक विचार नाही. ना फेरिवालेचे बोर्ड लावले असतात त्याच्याखाली फेरिवाच्या गाड्या असतात त्या बोर्डला कशाला खर्च केला. हा नाहक खर्च कशाला करायचा. जर गाड्या ह्या फेरिवाल्यांना लावायला द्यायच्या आहेत तर मग पालिकेचा नाहक खर्च कशाला करायचा.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

जोपर्यंत आपण त्याचा सर्व्हे करत नाही लायसन्स मिळत नाही.

**निलम ढवण :-**

सर्व्हे झालेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

सेवाशर्तीच्या नियमाच्या मंजूरीसाठी आणू शकता. एक सर्वेक्षण करु शकत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

खोट बोलतात.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

जबाबदारीने बोलतो रेकॉर्डींग होते.

**निलम ढवण :-**

साहेब मी समजू शकते. आज आयुक्त साहेब नाहीत तुमच्यावर अचानक जबाबदारी आलेली आहे. मी समजु शकते पण ह्या आमच्या भावना आहेत. तीन वर्ष सतत ह्या गोष्टीसाठी झगडतो. खरोखर ही झगडायची वेळ आली नाही पाहिजे. ह्या लोकांच्या समस्या आहेत लोक म्हणतात नगरसेवक तिथे काय करतात. फेरिवाल्याच्या बोर्डच्याखाली सगळ्या गाड्या लावल्या आहेत. चांगली वसूली चालू आहे. वसूली डबल होते. ठेकेदाराची मस्त वसूली चालू आहे. ठेकेदाराचा फायदा आहे. लोकांसाठी आपण काय करतो. हा विषय महासभेपूरता मर्यादित न ठेवता लवकरात लवकर ह्याच्यावर काय कारवाई करणार ह्याचे उत्तर द्यावे. त्यानंतर मागितलेली लेखी माहिती देण्यात यावी अशी आपणांस विनंती करते ह्या विषयावर गांर्भियपूर्वक विचार करावा. धन्यवाद.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो निलम ताईने खूपच चांगला प्रश्न विचारला आणि २०१३ चा प्रश्न आज चर्चेला आला. निलम ताईनी जो प्रश्न आणला आहे २८/०७/२०१३ चा प्रश्न आहे. प्रश्नोत्तराचा तास सुरु होता आणि आज मा. आयुक्त साहेब नाहीत. मा. महापौर मॅडम, ह्या प्रश्नोत्तराच्या तासात जी उत्तर देण्यात आली तर सभागृहाची दिशाभूल होते असे वाटत नाही. गेले ३ वर्ष सातत्याने लक्षवेधीच्या माध्यमातून हा प्रश्न मी उपस्थित करतो. सभागृहाचे लक्ष वेधण्यासाठी मा. महापौर मॅडम आणि मा. आयुक्त साहेब ६ प्रभागातले प्रभाग अधिकारी आले असतील तर त्यांना डायसवर बोलवता का? मा. महापौर मॅडम, माझी तुम्हाला विनंती असेल.

**मुन्ना सिंग :-**

प्रभाग अधिकारी को बूलाओ पूरे मिरा भाईंदर की समस्या है। विशेष उपाययोजना करीए या आप लोग बदली हो जाइए और किसीको आने दिजीए पुरे मिरा भाईंदर की समस्या है।

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, एवढी विनंती आहे की आजच्या सभेला प्रभागचे सहाही अधिकारी हजर आहेत का ते सांगा.

**मुन्ना सिंग :-**

मॅडम, सर्वांना बोलवा.

**मा. महापौर :-**

आपले मा. उपायुक्त जवाब द्यायला आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

तुमचे जे काय प्रश्न असतील त्याचे उत्तर द्यायला मा. उपायुक्त आहेत आणि वॉर्ड ऑफिसरला ते तसे निर्देश देतील.

**दिपीका अरोरा :-**

मा. महापौर मॅडम, वॉर्ड ऑफिसर का वहाँ जाकर कार्यवाही करनी होती है। पानपट्टे को वो जाकर रिपोर्ट नही करेंगे। ६-६ महिने ................

**मा. महापौर :-**

आप उनकी बात खत्म होने दिजीए।

**दिपीका अरोरा :-**

६ महिने तक मैंने शकल नही देखी। शायद यहाँ पर आऐगे तो उनकी शकल देखेगी।

(सभागृहात गोंधळ)

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, माझी तुम्हाला कळकळीची विनंती आहे की, त्यांची फक्त प्रेझेन्टी घ्या ते आले आहेत की नाही आले. मा. आयुक्त साहेब आपल्याला माहित आहे की ६ प्रभाग अधिकारी इथे उपस्थित आहेत. डायसवर बोलवू नका आहेत की नाही मध्ये उत्तर द्या. तुम्हाला ही माहिती घ्यावी लागेल. मी सभागृहाला विनंती करतो ब-याच सन्मा. सदस्यांना ह्या विषयावर बोलायचे असेल परंतु मा. महापौर मॅडम, ह्या विषयाचे गांर्भिय लक्षात घ्या. सन्मा. नगरसेवकांची इथे प्रेझेन्टी घेतली जाते. मा. आयुक्त आपल्यालाही कल्पना नाही की इथे किती एच.ओ.डी. हजर आहेत किंवा प्रभाग अधिकारी किती हजर आहेत. सन्मा. सदस्यांनी जसे सांगितले प्रभाग अधिकारी आमचे फोनही रिसिव्ह करत नाही. ह्यांना प्रशासनाकडून मोबाईल फोन देण्यात आले आहेत ते लोकप्रतिनिधींचे फोनही उचलू शकत नाही. ट्रू कॉलरमध्ये माझे त्यांचे रेकॉर्डिंग आहे. तुम्ही म्हणता कारवाई केली किती हातगाड्या आणल्या आपण ठेका पध्दतीने त्या हातगाड्या विकतो. तोडफोड करुन भंगारात सामान विकले जाते. मा. आयुक्त महोदय तिकडून आपल्याला किती महसूल मिळतो.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

वॉर्ड लेवलला महिन्याला बैठक होते तेव्हा चर्चा होत असेलच ना.

**सुहास रकवी :-**

मॅडम ते खोट बोलतात.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

धोरणात्मक निर्णयाबद्दल चर्चा होते.

**निलम ढवण :-**

हा विषय तिथे होत नाही म्हणून इथे घेण्यात आला. तिथे काहीच कारवाई होत नाही म्हणून हा विषय इथे घ्यायची वेळ आली.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

फोन उचलत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

मी त्याच्यांवर कारवाई करतो.

**निलम ढवण :-**

कारवाई करणारे लोक देखील उचलत नाही. आता जर सांगितले रस्ता खाली करा कारवाई करा तर ते देखील फोन उचलत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

नाव द्या मी त्यांच्यावर कारवाई करतो.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब किती प्रभाग अधिकारी हजर आहेत त्याची माहिती द्या.

**निलम ढवण :-**

त्या-त्या एरियातील कर्मचा-यांची प्रभाग अधिका-यांची नाव आपल्याकडे असतील ना.

**वंदना चक्रे :-**

मी आपल्या परवानगीने बोलते.

**मा. महापौर :-**

मी परवानगी दिली नाही आपण बसून जा.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब तुम्हाला विनंती करतो.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

२ प्रभाग अधिकारी उपस्थित आहेत.

**प्रशांत दळवी :-**

२ प्रभाग अधिकारी उपस्थित आहेत. आज महासभा आहे ही महासभा किती महिन्यांनी लागली आहे. ह्याचे प्रभाग अधिकारींना काहीच गांर्भिय नाही. मा. महापौर मॅडम, काय कारवाई करणार त्यांना रुलिंग द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

ह्यापुढे महासभेला प्रभाग अधिकारी उपस्थित राहतील अशी सुचना देतो.

**प्रशांत दळवी :-**

आज महासभा आहे ह्याची त्यांना कल्पना होती का? आज ते ह्या सभेला उपस्थित नाही तर त्यांनी कारण दिली आहेत का? ते कुठे जाणार होते. कोर्टात जाणार होते. मा. महापौर मॅडम, माझी तुम्हाला कळकळीची विनंती आहे मी वाटल्यास तुम्हाला दंडवत घालीन. परंतु ह्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये फेरिवाल्यांनी हैदोस घातला आहे. मा. महापौर मॅडम, वारंवार ह्या प्रश्नाने मी आपले गांभिर्याने लक्ष वेधतो परंतु प्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष होते. मा. महापौर मॅडम, आमच्या प्रभागातला नागरीक टॅक्स भरतो आणि ह्या टॅक्स भरत असलेल्या नागरिकाला त्या फेरिवाल्यांनी त्या बिल्डींगला पूर्ण विळखा घातला होता. अशाप्रकारे त्या बिल्डींगचे १५-२० लेटर आम्ही मा. आयुक्तांना देण्यात आले आणि मा. महापौर मॅडम, तुम्हाला पण कॉपी देण्यात आली. मा. महापौर मॅडम, मी पुन्हा एकदा सांगतो आम्हाला स्मरणपत्र देण्यात येतात. हे पाचवे स्मरणपत्र मा. आयुक्तांना देण्यात आले आहे. ह्या पलीकडे जाऊन आम्हाला ह्या क्षेत्रामध्ये काम करायची आहेत. आम्हाला त्या रस्त्यावरुन फिरायचे आहे. आम्ही स्वतः ह्या प्रश्नावर निर्लज्जपणाचा कळस गाठलेला आहे. परंतु प्रशासन त्याच्याकडे अजिबात लक्ष वेधत नाही. आज गाड्या नाहीत पोलिस प्रोटेक्शन नाही. आज गाड्या आणून तिकडे थांबवून ह्यांची वसूली चालू होते. असा माझा प्रशासनावर आरोप आहे. त्या गाड्या उभ्या असतात एकही अधिकारी तिथे नसतो. मा. महापौर मॅडम, आपल्या निदर्शनास एक गोष्ट आणून देतो प्रभाग ३८ चे इलेक्शन असताना आपण स्वतः त्या अधिका-याला पकडले आहे. चहा पित असताना ए.सी. गाड्यामध्ये बसून लोक चहा पित असतात. काय कारवाई करतात. मा. आयुक्त महोदय जेव्हा अनधिकृत बांधकाम असते तेव्हा पोलिसांची गरज लागत नाही. त्यावेळेला बरोबर तिकडे जात असतात. आम्ही प्रभाग अधिका-यांना लेटर द्यायचे करत नसतील. मा. आयुक्तांना लेटर द्यायचे. मा. आयुक्त महोदय पुन्हा त्याच प्रभाग अधिकारी रिमार्क करतात ह्याचा खुलासा करा म्हणून. नगरसेवकांना त्यांचे अजिबात उत्तर दिले जात नाही. प्रभाग अधिकारी हा त्या प्रभागातला आयुक्त म्हणून काम करतो. मा. महापौर मॅडम, आम्ही कोणाकडे दाद मागायची. आम्ही सभागृहात आमच्या भावना व्यक्त केल्या. थोडा फार शब्द इकडेतिकडे झाला तर सभागृह सोडून निघून जातात. आम्ही आमच्या घरची काम सांगत नाही. आम्ही लोकांच्या भावना व्यक्त करतो. सभागृहामध्ये येताना आम्हाला लोकांच्या भावना व्यक्त कराव्या लागतात. सोशल मिडीयावर आमची खरडपट्टी काढली जाते. त्या स्टेशन परिसराला पूर्ण विळखा घातला जातो. चैन स्केचिंग होते. गूंडागर्दी चालू आहे. मा. महापौर मॅडम, अजून एक गोष्ट तुमच्या निदर्शनास आणून देतो पोलिसांची परवानगी नसताना पोलिसांनी जस प्रथम महानगरपालिका आयुक्तांना दिल होत की रस्त्यावरती फटाके विक्रीला बंदी घाला परंतु तसे झाले नाही. त्याची एन.ओ.सी. आल्यानंतर महानगरपालिका परवानगी देईल असे प्रभाग अधिकारीमार्फत सांगण्यात आले. मा. महापौर मॅडम, मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो असे असले तरी त्या तिकडच्या प्रभाग अधिका-यांनी दुर्लक्ष केले आणि त्या तिथे रस्त्यामध्ये फटाके वाल्यांना परमिशन दिली. मा. महापौर मॅडम, तुम्ही सभागृहापुढे रुलींग द्या की त्या ठिकाणी जो काही हैदोस चालला आहे ....................

**सुहास रकवी :-**

अधिका-यांवर कारवाई करायला सांगा.

**प्रशांत दळवी :-**

जे फेरिवाले आहेत त्या ठिकाणी एकही फेरिवाला दिसला नाही पाहिजे.

**सुहास रकवी :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो.

**मा. महापौर :-**

आपल्याला परवानगी दिली नाही आपण बसा.

**प्रशांत दळवी :-**

मॅडम माझी विनंती आहे आपण त्या बाबतीची रुलिंग अनधिकृत बांधकाम विभाग अतिक्रमण विभागाचे जे विभाग प्रमुख असतील त्यांना डायसवर बोलवा आणि त्यांच्यासमोर रुलिंग द्या.

**सुहास रकवी :-**

मॅडम दोन मिनिट बोलायला द्या आमच्याकडे पण बाजाराचा विषय गंभीर आहे. मॅक्सेस मॉलच्या मागे अजूनही गाडया पडल्या आहेत. कोणी आले नाही आणि कारवाई केली नाही. आम्ही स्वतः तिथे उभे राहून

आणि स्थानिक जे पुढारी आहेत त्यांना घेऊन कारवाई केली. दुसरी गोष्ट तुम्ही बाजार वसुलीबाबत ऐका मॅडम बाजार वसुली झालेली नाही.
(सभागृहात गोंधळ)
**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**
ह्या १५ दिवसांत मोठया प्रमाणात कारवाई करतो.
(सभागृहात गोंधळ)
**दिनेश नलावडे :-**
मा. महापौर मॅडम सत्ताधारी बोलतात विरोधक जाणार कुठे?
(सभागृहात गोंधळ)
**मा. महापौर :-**
प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.
**नगरसचिव :-**
आजच्या सभेसाठी तीन लक्षवेधी आल्या आहेत.
(सभागृहात गोंधळ)
**सुहास रकवी :-**
सचिवसाहेब, थांबा रुलिंग झाली आहे का?
**नगरसचिव :-**
रुलिंग दिली आहे.
**शरद पाटील :-**
आता पाणपट्टे साहेबांनी सांगितले की १५ दिवसांत कारवाई करु.
(सभागृहात गोंधळ)
**मा. महापौर :-**
ज्याचा प्रश्न होता त्यांना उत्तर दिली आहेत. प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.
(सभागृहात गोंधळ)
**मा. महापौर :-**
प्रशांत केळुसकर आपली लक्षवेधी स्वीकारली आहे. आपण उठून बोला.
(सभागृहात गोंधळ)
**वंदना चक्रे :-**
मा. महापौर मॅडम रुलिंग द्या.
(सभागृहात गोंधळ)
**भगवती शर्मा :-**
सचिव साहेब हे दोघे विषय आम्ही फेटाळले मंजूरी देत नाही.
(सभागृहात गोंधळ)
**सुहास रकवी :-**
महापौर मॅडम त्यांनी विचारलेल्या प्रश्नाची उत्तर देता तर आमच्या प्रश्नांची उत्तर द्यायची नाही का? आम्ही विचारलेले त्यांनी ऐकायचे नाही का?
(सभागृहात गोंधळ)
**मा. महापौर :-**
विषय आल्यावर प्रश्न विचारा आता प्रश्नोत्तरमध्ये त्यांचा प्रश्न होता आणि त्यांना जवाब मिळाला आहे.
**सुहास रकवी :-**
त्यांना जवाब मिळाला नाही.
**भगवती शर्मा :-**
आम्हाला तिन्ही लक्षवेधी वाचून दाखवा.
(सभागृहात गोंधळ)
**सुमन कोठारी :-**
सचिवसाहेब आजसे पहले कभी लक्षवेधी पढी नही जाती थी। जो मंजूर होती थी वही पढी जाती थी।
(सभागृहात गोंधळ)
**जुबेर इनामदार :-**
सचिवसाहेब तुम्हाला प्रश्न आहे. लक्षवेधी अधिनियमात नाही.
(सभागृहात गोंधळ)
**नगरसचिव :-**
प्रकरण क्र. १०९, दि. २३/०३/२०१५, दि. ३०/०३/२०१५, दि. ३०/०३/२०१५ (दि. २३/०३/२०१५ रोजीची तहकुब सभा), दि. १३/०५/२०१५ दि. १७/०६/२०१५ दि. ०१/०७/२०१५, व दि. ०१/०७/२०१५ (दि. ०१/०७/२०१५ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**रोहिदास पाटील :-**

दि. २३/०३/२०१५, दि. ३०/०३/२०१५, दि. ३०/०३/२०१५ (दि. २३/०३/२०१५ रोजीची तहकुब सभा), दि. १३/०५/२०१५ दि. १७/०६/२०१५ दि. ०१/०७/२०१५, व दि. ०१/०७/२०१५ (दि. ०१/०७/२०१५ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे

**प्रकरण क्र. १०९ :-**

दि. २३/०३/२०१५, दि. ३०/०३/२०१५, दि. ३०/०३/२०१५ (दि. २३/०३/२०१५ रोजीची तहकुब सभा), दि. १३/०५/२०१५ दि. १७/०६/२०१५ दि. ०१/०७/२०१५, व दि. ०१/०७/२०१५ (दि. ०१/०७/२०१५ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ८० :-**

दि. २३/०३/२०१५, दि. ३०/०३/२०१५, दि. ३०/०३/२०१५ (दि. २३/०३/२०१५ रोजीची तहकुब सभा), दि. १३/०५/२०१५ दि. १७/०६/२०१५ दि. ०१/०७/२०१५, व दि. ०१/०७/२०१५ (दि. ०१/०७/२०१५ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११०, मिरारोड (पू.) आरक्षण क्र. १७८ खेळाचे मैदान आणि आरक्षण क्र. १७० आला हजरत खेळाचे मैदान येथे आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रम २०१५-१६ अंतर्गत सामाजिक सभागृह बांधणे कामाबाबत.

**प्रशांत दळवी :-**

१) मिरारोड (पूर्व) नयानगर आरक्षण क्र. १७८, खेळाचे मैदानात राज्य शासनाच्या प्राथमिक मुलभुत सोयी सुविधा योजनेअंतर्गत मल्टीपर्पज हॉल बांधण्याचे रु.२.०१ कोटी रकमेचे काम प्रस्तावित असल्याने सदर ठिकाणी स्थानिक विकास कार्यक्रमातंर्गत सामाजिक सभागृह बांधण्याची आवश्यकता नाही.

२) मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. १७० आला हजरत खेळाचे मैदान असून सदर आरक्षणाच्या असलेल्या एकूण जागेपैकी मोठ्या जागेत एस.टी.पी. प्लांट बांधल्याने सदर मैदान लहान झाले आहे. त्यामुळे सदर मैदानात स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सामाजिक सभागृह बांधणे योग्य होणार नाही. त्यामुळे सदर काम करण्यात येऊ नये.

३) मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर नं. ९ लोकमान्य टिळक खेळाचे मैदान येथे राज्य शासनाच्या प्राथमिक मुलभुत सोयी सुविधा कार्यक्रम अंतर्गत मल्टीपर्पज बांधण्यासाठी रु.२.०१ कोटी रकमेचे काम प्रस्तावित असल्याने सदर जागेत स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सामाजिक सभागृह बांधणे योग्य होणार नाही. त्यामुळे सदर काम करण्यात येऊ नये.

४) मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर क्र. ०२ वॉर्ड क्र. ३८ मध्ये डी/३, डी/४, सी/५, सी/६ इमारती जवळ असलेल्या मैदानालगतचा स्टेज हे कमी पडत असल्याने सदर जागेत स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सामाजिक सभागृह बांधणे कामास मान्यता देण्यात येत आहे.

मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर क्र. ०२ वॉर्ड क्र. ३८ मध्ये डी/३, डी/४, सी/५, सी/६ इमारती जवळ असलेल्या मैदानालगतचा स्टेज हे कमी पडत असल्याने सदर जागेत स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सामाजिक सभागृह बांधणे कामास मान्यता देण्यात येत आहे.

**दिप्ती भट :-**

माझे अनुमोदन आहे.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरारोड (पू.) आरक्षण क्र. १७८ खेळाचे मैदान आणि आरक्षण क्र. १७० आला हजरत खेळाचे मैदान येथे आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रम २०१५-१६ अंतर्गत सामाजिक सभागृह बांधण्यासाठी मागणी केलेली आहे. मा. महासभा दि. ०१/०७/२०१५ ठराव क्र. १७ मिरा भाईंदर महानगरपालिका उद्याने, मैदाने, आरजी. या जागेत लहान स्टेज, सामाजिक सभागृह अशी कामे करण्यात यावीत. भविष्यात या जागेत मोठे हॉल अथवा सार्वजनिक सुविधासाठी काही बांधावयाचे असल्यास मा. महासभेची मंजूरी घ्यावी असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त आमदार स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत या शहराचे माजी आमदार मा. श्री. गिल्बर्ट मेंन्डोन्सा साहेब यांनी या शहराच्या विविध विकास कामांसाठी शासनाची रु. ९,४२,७७,२००/- एवढी विशेष निधी उपलब्ध करु दिली होती व महापालिकेचे तात्कालीन आयुक्त यांच्या मंजूरीने प्रशासनाने कार्यपध्दती अनुसार निविदा प्रक्रिया पूर्ण केली. तद्नंतर सदर विषय मंजूरीसाठी दि. २८/०८/२०१५ रोजीच्या प्रकरण क्र. ८० अन्वये महानगरपालिका स्थायी समिती सभा समोर ठेवण्यात आले. सदर विषयावर झालेला ठराव क्र. ७६ प्रमाणे अनुक्रमांकीक ०१ ते ०४ विषयांवर आक्षेप घेण्यात आले.

**अ.क्र. १ :-** भाईंदर (प.) पोलीस स्टेशन समोरील रस्ता, नगरभवन व पुढे मॅक्सस पोलीस चौकी पर्यंत क्राँकीटचा रस्ता तयार करणे (विशेष अनुदान)

**मा. स्थायी समितीने घेतलेले आक्षेप :- अ.क्र.१** च्या कामा ठिकाणी रस्त्यावर भुयारी गटार योजने अंतर्गत भाईंदर पोलीस स्टेशन ते नगरभवनपर्यंत पाईप लाईन टाकण्याचे काम बाकी आहे. सदर काम प्रथम त्वरीत सुरु करण्यात यावे.

**वस्तुस्थिती :-** सदर ठिकाणी भुयारी गटाराचे काम पूर्ण झालेले असून तिथे मंजूर केलेले काम करण्यास काही हरकत नाही.

**अ.क्र. २ :-** मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. ३५५ या जागेत नागरीकांच्या सोयी सुविधांकरीता कम्युनिटी हॉल व इतर आवश्यक सोयीयुक्त इमारती बांधणे. (विशेष अनुदान)

**मा. स्थायी समितीने घेतलेले आक्षेप :- अ.क्र.२** च्या कामात आरक्षण क्र. ३५५ ची संपूर्ण जागा १०० टक्के महानगरपालिकेच्या ताब्यात नसून सदर जागेवर कम्युनिटी हॉलचा नकाशा मंजूर केलेला नाही. सदर कम्युनिटी सेंटर बांधण्यासाठी जागा ताब्यात घेवून नकाश मंजूर करुन घेण्यात यावा. तसेच सदर जागेवर क्रिडांगणाचे आरक्षण आहे. सदर जागेत कम्युनिटी हॉल बांधण्याकरीता मा. महासभेची मान्यता आवश्यक आहे.

**वस्तुस्थिती :-** मिरा भाईंदर महानगरपालिकेची बरीच आरक्षणे आज दिनांकापर्यंत ताब्यात आलेली नाहीत. तरीही त्यांना विकसित करण्यासाठी मा. महासभेने वेळोवेही मंजूरी दिलेली आहे व सदरचे आरक्षण ९० टक्के हून अधिक महापालिकेच्या ताब्यात आलेले आहे. तरी आरक्षण क्र. ३५५ महापालिकेच्या ताब्यात आलेल्या जागेमध्ये कम्युनिटी सेंटर बांधण्यास काही हरकत नसावी.

**अ.क्र.३ :-** भाईंदर पश्चिम येथे नविन विसर्जन घाट बांधणे (विशेष अनुदान) (फेर निविदा) (दोन मुदतवाढी)

**मा. स्थायी समितीने घेतलेले आक्षेप :- अ.क्र.३** च्या कामाची जागा सी.आर. झेड. मध्ये येत आहे व सी.आर.झेड. ची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर मंजूरी प्रथम घेण्यात यावी.

**वस्तुस्थिती :-** सदरची जागा सी.आर.झेड. ने बाधीत होत असली तरी मेरीटाईम बोर्डच्या माध्यामातून भाईंदर पूर्वच्या धर्तीवर जसे काम करुन घेण्यात येत आहे तसे हेही काम त्याच माध्यमातून करुन घेण्यात यावे.

**अ.क्र.४ :-** उत्तन घनकचरा प्रकल्प येथे गटार व विहीर बांधणे (दोन मुदतवाढी)

**मा. स्थायी समितीने घेतलेले आक्षेप :- अ.क्र.४** च्या कामात घनकचरा प्रकल्पा ठिकाणी प्रथम कुंपणभिंत बांधणे आवश्यक असल्याने कुंपणभिंतीची निविदा मान्य होणे आवश्यक आहे.

**वस्तुस्थिती :-** घनकचरा प्रकल्पामध्ये गोळा होणाऱ्या कचऱ्यामधून सुमारे २० टक्के लिचडची उत्पत्ती होत असते. त्या लिचडचे प्रवाह योग्य स्वरुपात होण्यासाठी गटार व विहिर बांधणे गरजेचे आहे. तरी प्रस्तावित काम करण्यात यावे.

स्थायी समितीमध्ये घेतलेला निर्णय अयोग्य आहे. स्थायी समितीचे सदस्य तांत्रिक दृष्टीकोनातुन सक्षम नसतात, तरी महापालिका मा. आयुक्त यांनी हा निर्णय आपल्या स्तरावर घेणे शहर विकास व आर्थिकदृष्ट्या महानगरपालिकेच्या हिताचे आहे. सन्मा. आमदार मा. श्री. गिल्बर्ट मेंन्डोन्सा यांनी प्रस्तावित केलेल्या कामांना मंजूरी देवून तातडीने करण्यात यावेत. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरारोड (पू.) आरक्षण क्र. १७८ खेळाचे मैदान आणि आरक्षण क्र. १७० आला हजरत खेळाचे मैदान तसेच शांती नगर सेक्टर क्र. ९ लोकमान्य टिळक मैदान येथे आमदार मुझफ्फर हुसैन यांच्या आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०१५-१६ अंतर्गत सामाजिक सभागृह बांधण्यासाठी मागणी केलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेची मालमत्ता विविध कार्यक्रम व क्रिडा स्पर्धेसाठी भाडेवर दिली जातात. तसेच क्रिडा स्पर्धेच्या कामासाठीही वापरले जातात. खासदार, आमदार यांच्याकडून शहर विकासासाठी शासनाची निधी स्विकारणे महापालिकेच्या आर्थि हिताचे आहे. सन्मा. आमदार, खासदारांना स्वतंत्रपणे विकासाची कामे प्रस्तावित करण्याचा अधिकार प्राप्त आहे व त्यांना मा. महासभेची मंजूरीची गरज लागत नाही. तरी सदरची उल्लेखनीय कामे आमदार श्री. मुझफ्फर हुसैन साहेबांच्या आमदार निधीतुन करण्यात यावे व भविष्यात आमदार, खासदारांच्या माध्यमातून विकासासाठी मिळणारा शासनाचा निधी वापरण्यास आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचाच अधिकार आहे व त्यांनी तो निर्णय प्रशासकीय स्तरावर घ्यावा असा मी ठराव मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम ठराव मतदानाला घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सचिव साहेब ठराव मतदानाला घ्या.

**भगवती शर्मा :-**

मॅडम चर्चा करायची आहे.

**मा. महापौर :-**

तुम्ही ठरावाच्या अगोदर चर्चा करायची तुम्ही ठराव मांडला आहे.

(सभागहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११० करिता दोन ठराव आले आहेत सुचक प्रशांत दळवी अनुमोदन दिप्ती भट दूसरा ठराव सुचक जुबेर इनामदार अनुमोदन आसिफ शेख. जुबेर इनामदार ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजून असतील त्यांनी हात वर करायचे. ह्यांच्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. प्रशांत दळवी ह्यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

प्रशांत दळवी ह्यांच्या बाजूने ३९ विरोधात ३३ मते पडलेली आहेत. प्रशांत दळवी ह्यांनी मांडलेला ठराव बहूमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ११० :-**

मिरारोड (पू.) आरक्षण क्र. १७८ खेळाचे मैदान आणि आरक्षण क्र. १७० आला हजरत खेळाचे मैदान येथे आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रम २०१५-१६ अंतर्गत सामाजिक सभागृह बांधणे कामाबाबत.

**ठराव क्र. ८१ :-**

१) मिरारोड (पूर्व) नयानगर आरक्षण क्र. १७८, खेळाचे मैदानात राज्य शासनाच्या प्राथमिक मुलभुत सोयी सुविधा योजनेअंतर्गत मल्टीपर्पज हॉल बांधण्याचे रु.२.०१ कोटी रकमेचे काम प्रस्तावित असल्याने सदर ठिकाणी स्थानिक विकास कार्यक्रमातंर्गत सामाजिक सभागृह बांधण्याची आवश्यकता नाही.

२) मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. १७० आला हजरत खेळाचे मैदान असून सदर आरक्षणाच्या असलेल्या एकूण जागेपैकी मोठ्या जागेत एस.टी.पी. प्लांट बांधल्याने सदर मैदान लहान झाले आहे. त्यामुळे सदर मैदानात स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सामाजिक सभागृह बांधणे योग्य होणार नाही. त्यामुळे सदर काम करण्यात येऊ नये.

३) मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर नं. ९ लोकमान्य टिळक खेळाचे मैदान येथे राज्य शासनाच्या प्राथमिक मुलभुत सोयी सुविधा कार्यक्रम अंतर्गत मल्टीपर्पज बांधण्यासाठी रु.२.०१ कोटी रकमेचे काम प्रस्तावित असल्याने सदर जागेत स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सामाजिक सभागृह बांधणे योग्य होणार नाही. त्यामुळे सदर काम करण्यात येऊ नये.

४) मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर क्र. ०२ वॉर्ड क्र. ३८ मध्ये डी/३, डी/४, सी/५, सी/६ इमारती जवळ असलेल्या मैदानालगतचा स्टेज हे कमी पडत असल्याने सदर जागेत स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सामाजिक सभागृह बांधणे कामास मान्यता देण्यात येत आहे.

मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर क्र. ०२ वॉर्ड क्र. ३८ मध्ये डी/३, डी/४, सी/५, सी/६ इमारती जवळ असलेल्या मैदानालगतचा स्टेज हे कमी पडत असल्याने सदर जागेत स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सामाजिक सभागृह बांधणे कामास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदक :- श्रीम. दिप्ती भट्ट**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शरद केशव पाटील | १ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | निरंक |
| २ | पाटील रोहिदास शंकर | २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३ | सिमा कमलेश शहा | ३ | ध्रुवकिशोर पाटील | |
| ४ | जैन गिता भरत | ४ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ५ | अरोरा दिपीका पंकज | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ६ | रावल भगवती जयशंकर | ६ | असेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ७ | मेहता डिंपल विनोद | ७ | शिल्पा भावसार | |
| ८ | मेघना दिपक रावल | ८ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ९ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ९ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| १० | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १० | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ११ | सुजाता रविकांत शिंदे | ११ | पाटील वंदना विकास | |
| १२ | पाटील प्रेमनाथ गजानन | १२ | शबनम लियाकत शेख | |
| १३ | सिंग मदन उदितनारायण | १३ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १४ | कांगणे यशवंत ठकाजी | १४ | विराणी रेखा अनिल | |
| १५ | अनिल बाबुराव भोसले | १५ | पुजारी कांचना शेखर | |
| १६ | कासोदरीया अश्विन श्यामजी | १६ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १७ | जैन दिनेश तेजराज | १७ | डिसा मर्लिन मर्विन | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | जैन रमेश धरमचंद | १८ | वंदना रामदास चक्रे | |
| १९ | निलम हरिश्चंद्र ढवण | १९ | अनिता जयवंत पाटील | |
| २० | तारा विनायक घरत | २० | गोविंद हेलन जॉर्जी | |
| २१ | शुभांगी महिन कोटियन | २१ | काझी रशीदा जमील | |
| २२ | जयमाला किशोर पाटील | २२ | इनामदार जुबेर | |
| २३ | परमार अनिता भरत | २३ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २४ | पाटील प्रणाली संदिप | २४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २५ | गावंड मंदाकिणी आत्माराम | २५ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २६ | म्हात्रे प्रभाकर प्रद्माकर | २६ | सामंत प्रमोद जयराम | |
| २७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | २७ | रकवी सुहास माधवराव | |
| २८ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | २८ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २९ | प्रविण मोरेश्वर पाटील | २९ | खण्डेलवाल सुरेश | |
| ३० | शाह राकेश रतिशचंद्र | ३० | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| ३१ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३१ | डॉ. आसिफ शेख | |
| ३२ | केळुसकर प्रशांत नारायण | ३२ | भोईर कमलेश यशवंत | |
| ३३ | भोईर भावना राजू | ३३ | रविंद्र भिमदेव माळी | |
| ३४ | भोईर राजू यशवंत | | | |
| ३५ | जाधव मोहन महादेव | | | |
| ३६ | मुन्ना सिंग | | | |
| ३७ | ॲड. रवि व्यास | | | |
| ३८ | दिप्ती शेखर भट | | | |
| ३९ | मयेकर सरस्वती रजनीकांत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १११, करार तत्वावरील बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW) यांच्या ठोक मानधनात वाढ करणेबाबत.

**मदन उदित नारायण सिंह :-**

सचिव साहेब तुम्हाला प्रश्न आहे. आपला इतिवत्तांत मंजूरी झाली ना. आता ह्याचे काय करायचे.

**सुहास रकवी :-**

मॅडम तुम्ही त्यांचे ऐकून घेता. इतिवृत्तांताला मंजूरी झालीच नाही.

**मदन उदित नारायण सिंह :-**

२३/०३ ते ०१/०७ पर्यंत जी महासभा केली जो प्रस्ताव दिला आम्ही ठराव मांडला अनुमोदन केल. आम्ही सर्व सदस्यांनी जे मनात येईल ते बोलल आता ह्याचे काय करायचे.

**सुहास रकवी :-**

इतिवृत्तांत मंजुरी सुरुवातीलाच करायला पाहिजे होता.

**मदन उदित नारायण सिंह :-**

नाही जे इतिवृत्तांत मंजूरी झाली त्याच्यात आलेल्या ठरावाचे अनुपालन झाले आहे का? अनुपालन नाही झाले तर हे घेऊन काय करायचे रद्दीत विकायचे का?

**नगरसचिव :-**

ती प्रशासनाची बाब आहे.

**मा. महापौर :-**

मदन उदित नारायण सिंगजी आप बैठ जाइए।

**मदन उदित नारायण सिंह :-**

मॅडम हम लोग यहाँ क्यों आते है। हम लोग शहर की समस्या के लिए आते है। हम सत्ताधारी है, हमको बोलना नही चाहिए। अगर काम नही होता तो सत्ताधारी का काम कैसे होगा। जो प्रस्ताव लाया एक का भी अनुपालन नही हुआ और न होगा तो उसका हम क्या करे। महासभा बंद करो नाटक क्यों करने का?
(सभागृहात गोंधळ)

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

प्रशासनाला मिनिट्स आता प्राप्त झाले अनुपालन अहवाल पुढच्या महासभेत देण्यात येईल.
(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रुग्णांना प्राथमिक वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी ११ नागरी आरोग्य केंद्र व १ रुग्णालय कार्यरत आहे. वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत सुरु असलेल्या आरोग्य केंद्रामार्फत सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राबविण्यात येतात. सदर कार्यक्रमापैकी "राष्ट्रीय किटकजन्य आजार नियंत्रण कार्यक्रम" हा एक महत्वाचा आरोग्य कार्यक्रम आहे. सदर कार्यक्रमात घरोघरी सर्वेक्षण करुन डास अळीसाठी पाण्याचे साठे तपासणे, डास अळी असलेल्या साठ्याची विल्हेवाट लावणे, तापाचे रुग्ण शोधून रक्त तपासणी करणे, समुळ औषधोपचार देणे इ. कामे केली जातात.

सदर कार्यक्रम राबविणेसाठी विहित निकषानुसार ४१ बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी आवश्यक आहेत.

आवश्यक ४१ कर्मचाऱ्यांपैकी सद्यस्थितीत ३२ बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी कार्यरत आहेत. सदर कर्मचाऱ्यांची शासन निर्णयानुसार विहित भरती प्रक्रियेचा अवलंब करुन भरती केली आहे. सदर कर्मचाऱ्यांना मा. महासभा दि.१४/१२/२०१२, ठराव क्र.२७ अन्वये ठोक मानधन प्रतीमाह रु.७०००/- यावर नियुक्ती केली आहे.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (M.P.W.) वर्ग-३ यांची वेतनश्रेणी रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.२४००/- असुन, प्रसविका या पदाची वेतनश्रेणी रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.२४००/- आहे. परंतु बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी यांना मा. महासभा दि.१४/१२/२०१२, ठराव क्र.२७ अन्वये रु.७०००/- प्रतीमहा मानधन आहे व प्रसविका या वैद्यकीय आरोग्य विभागातील पदासाठी मा. महासभा दि.१५/०१/२०१३, ठराव क्र.३७ अन्वये यामध्ये मानधन वाढ करुन, रु.१२०००/- प्रतीमहा ठोक मानधन अदा करण्यात येत आहे.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी या पदासाठी असलेले मानधन अतिशय कमी आहे. बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी व प्रसविका या दोन्ही वर्ग-३ चे स्थायी पदास रु.५२००-२०२०० ग्रेड पे रु.२४००/- अशी एकच वेतन श्रेणी आहे. अस्थायी प्रसविका कर्मचाऱ्यांना मा. महासभा दि.१५/०१/२०१३, ठराव क्र.३७ अन्वये १२०००/- ठोक मानधन प्रतीमहा देणेबाबत मंजुर असुन, त्यानुसार त्यांना सदरचे ठोक मानधन देणेत येत आहे. त्याच धर्तीवर करार तत्वावरील ३२ बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (M.P.W.) यांना रु.९०००/- प्रतीमहा ठोक मानधन देणेस हि सभा मंजुरी देत आहे.

**डिंपल मेहता :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १११ :-**

करार तत्वावरील बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW) यांच्या ठोक मानधनात वाढ करणेबाबत.

**ठराव क्र. ८२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रुग्णांना प्राथमिक वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी ११ नागरी आरोग्य केंद्र व १ रुग्णालय कार्यरत आहे. वैद्यकीय आरोग्य विभागांतर्गत सुरु असलेल्या आरोग्य केंद्रामार्फत सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राबविण्यात येतात. सदर कार्यक्रमापैकी "राष्ट्रीय किटकजन्य आजार नियंत्रण कार्यक्रम" हा एक महत्वाचा आरोग्य कार्यक्रम आहे. सदर कार्यक्रमात घरोघरी सर्वेक्षण करुन डास अळीसाठी पाण्याचे साठे तपासणे, डास अळी असलेल्या साठ्याची विल्हेवाट लावणे, तापाचे रुग्ण शोधून रक्त तपासणी करणे, समुळ औषधोपचार देणे इ. कामे केली जातात.

सदर कार्यक्रम राबविणेसाठी विहित निकषानुसार ४१ बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी आवश्यक आहेत.

आवश्यक ४१ कर्मचाऱ्यांपैकी सद्यस्थितीत ३२ बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी कार्यरत आहेत. सदर कर्मचाऱ्यांची शासन निर्णयानुसार विहित भरती प्रक्रियेचा अवलंब करुन भरती केली आहे. सदर कर्मचाऱ्यांना मा. महासभा दि.१४/१२/२०१२, ठराव क्र.२७ अन्वये ठोक मानधन प्रतीमाह रु.७०००/- यावर नियुक्ती केली आहे.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (M.P.W.) वर्ग-३ यांची वेतनश्रेणी रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.२४००/- असुन, प्रसविका या पदाची वेतनश्रेणी रु.५२००-२०२०० ग्रेड वेतन रु.२४००/- आहे. परंतु बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी यांना मा. महासभा दि.१४/१२/२०१२, ठराव क्र.२७ अन्वये रु.७०००/- प्रतीमहा मानधन आहे व प्रसविका या वैद्यकीय आरोग्य विभागातील पदासाठी मा. महासभा दि.१५/०१/२०१३, ठराव क्र.३७ अन्वये यामध्ये मानधन वाढ करुन, रु.१२०००/- प्रतीमहा ठोक मानधन अदा करण्यात येत आहे.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी या पदासाठी असलेले मानधन अतिशय कमी आहे. बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी व प्रसविका या दोन्ही वर्ग-३ चे स्थायी पदास रु.५२००-२०२०० ग्रेड पे रु.२४००/- अशी एकच वेतन श्रेणी आहे. अस्थायी प्रसविका कर्मचाऱ्यांना मा. महासभा दि.१५/०१/२०१३, ठराव क्र.३७ अन्वये १२०००/- ठोक मानधन प्रतीमहा देणेबाबत मंजुर असुन, त्यानुसार त्यांना सदरचे ठोक मानधन देणेत येत आहे. त्याच धर्तीवर करार तत्वावरील ३२ बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (M.P.W.) यांना रु.९०००/- प्रतीमहा ठोक मानधन देणेस हि सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदक :- श्रीम. डिंपल मेहता**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११२, महानगरपालिका आकृतीबंधास व सुधारीत सेवा प्रवेश नियमांना मंजुरी मिळणेबाबत.

**निलम ढवण :-**

सदर विषयाचा गोषवारा उशिरा प्राप्त झाल्यामुळे सदर विषयाबाबत संबंधीत विभागप्रमुखांशी चर्चा विनिमय करुन अभ्यास करता आला नाही. यामुळे सदर विषयातील तांत्रिक बाबींची माहिती अवगत झाली नसल्याकारणाने सदरचा विषय सविस्तर माहितीसह पुढील मा. महासभेत घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**जयंतीलाल पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ११२ :-**

महानगरपालिका आकृतीबंधास व सुधारीत सेवा प्रवेश नियमांना मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ८३ :-**

सदर विषयाचा गोषवारा उशिरा प्राप्त झाल्यामुळे सदर विषयाबाबत संबंधीत विभागप्रमुखांशी चर्चा विनिमय करुन अभ्यास करता आला नाही. यामुळे सदर विषयातील तांत्रिक बाबींची माहिती अवगत झाली नसल्याकारणाने सदरचा विषय सविस्तर माहितीसह पुढील मा. महासभेत घेण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- सौ. निलम ढवण** **अनुमोदक :- श्री. जयंतीलाल पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११३, राज्यातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात मुलभुत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत विकास कामांबाबत.

**रोहिदास पाटील :-**

राज्यातील अल्पसंख्यांक व बहुल क्षेत्रात मुलभुत नागरी सुविधा उपलब्ध करुन देणेकामी शासन निर्णय क्र. क्षेविका-२०१५/प्र.क्र.७६/का.९, दि. १८/०६/२०१५ अन्वये अल्पसंख्याक क्षेत्रामध्ये मुलभूत सुविधा पुरविणे कामी संपूर्ण मिरा-भाईंदर शहरातील अल्पसंख्याक वस्त्यांमध्ये करावयाच्या कामांचे प्रस्ताव तयार करुन एकत्रित प्रस्ताव पुढील महासभेपुढे सादर करण्यात यावा.

**प्रशांत केळूसकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य रोहिदासजी पाटील यांनी या प्रकरणात जो ठराव मांडला आहे त्या संदर्भात या ठिकाणी आमचे ऑब्जेक्शन आहे. सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांना आता आपण ज्या पध्दतीने ठराव मांडलेला आहे. अल्पसंख्यांकांबाबत आपल प्रेम किती आहे हे यावरुन दिसून येते. या ठिकाणी मी आपल्याला सांगू इच्छितो की, महाराष्ट्र राज्य शासनाने राज्यातील सर्व महानगरपालिका आणि नगरपालिका यांना अल्पसंख्यांक निधीतून म्हणजे ज्या-ज्या परिसरामध्ये अल्पसंख्यांक विभाग आहे. महापौरांना इंट्रेस्टच नाही ना. अल्पसंख्यांकावर इंट्रेस्ट असणारच कसा? अल्पसंख्यांकावर इंट्रेस्ट नाहीच आपल्याला. काकांनी ठराव मांडला त्याच्यात त्यांच काही चुकत नसेल. त्यांना सहनही होत नाही. सांगता ही येत नाही अशी परिस्थिती आहे. त्यांच्या मनात किती चांगल्या भावना असल्या तरी त्यांना व्यक्त करता येत नाही. या ठिकाणी मा. महापौर मॅडम, आपणांस सांगू इच्छितो की, राज्य शासनाने आपण या ठिकाणी जो प्रस्ताव आणलेला आहे. कशासाठी आणलेला आहे आपण आणला नाही. राज्य शासनाने पाठवलेला विषय आपल्याकडे आहे. राज्य शासनाने राज्यातील सर्व महापालिका आणि नगरपालिका महापालिकेसाठी २० लाख रु. आणि नगरपरिषदेसाठी १० लाख रुपयांची तरतूद दरवर्षी होत असते आणि त्या-त्या ठिकाणी अल्पसंख्यांक निधीमधून आपल्याला काम करुन घ्यायची असतात. राज्य शासनामार्फत प्रस्ताव कलेक्टरकडे जातो. कलेक्टरच्यामार्फत आपल्या मा. आयुक्तांकडे येत असतो. अशी प्रथा संपूर्ण राज्यभर सुरु आहे. आपल्याकडे प्रस्ताव आल्यानंतर हा प्रस्ताव आपण तयार करुन सन्मा. जिल्हाधिकारींकडे पाठविला. जिल्हाधिका-यांकडून पुन्हा तो राज्य शासनाकडे गेलेला आहे. आणि राज्य शासनाने आपल्याला सांगितले आहे की, हा प्रस्ताव आलेला आहे. या प्रस्तावासाठी मा. महासभेच्या मंजूरीची आवश्यकता आहे आणि हा प्रस्ताव मा. महासभेची

मंजूरी घेऊन आपल्याकडे पुन्हा पाठवायचा आहे. परंतु आपण हा राज्य शासनाकडून आलेला प्रस्ताव नामंजूर करित आहोत. आणि तसे या ठिकाणी ठराव मांडला आहे. मॅडम हे अत्यंत चुकीचे आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, प्रस्ताव नामंजूर करण्यात आलेला नाही आहे.

**आसिफ शेख :-**

तुमची भुमिका तीच आहे. तुमच्या कथन आणि करणेमध्ये फरक आहे ना. प्रस्ताव नंतर फेरसादर करायचा याचा अर्थ काय? नामंजूर झाला आहे का बघायचा. एखाद्या गोष्टीमध्ये आपण निर्णय घ्यायचा नाही. निर्णय प्रलंबित ठेवायचा म्हणजे निर्णय घ्यायचा नाही असा अर्थ होतो.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, दिशाभूल करायची गरज नाही. हा नामंजूर केलेला विषय नाही आहे. आपण सगळ्या ठिकाणचे मिळून हा विषय नंतर घेण्यात यावा असा ठराव मांडला.

**प्रशांत केळूसकर :-**

शहरात बहुतांश ठिकाणी अल्पसंख्यांक राहतात त्या सगळ्याचा विचार करण्यात यावा.

**आसिफ शेख :-**

गेल्या दोन्ही आर्थिक वर्षात असेच राजकारण झाल्यामुळे निधी लॅब्स झालेला आहे. पुन्हा दोन वर्षांनी हा निधी आलेला आहे. २० लाख शासन देते. हा आपला निधी नाही. आपली मंजूरीची आवश्यकता आहे. महानगरपालिकेचे कर्तव्य आहे घटनेनुसार आपल्याला संपूर्ण समाजातील मग तो अल्पसंख्यांक असो की बहुसंख्यांक असो. अल्पसंख्यांकात सर्व समाजाची लोक येतात. जैन पण येतात, कॅथलिक समाजाची लोक, पंजाबी, सगळी लोक ह्या ठिकाणी येतात. माझे ह्या ठिकाणी म्हणणे आहे २० लाख रु. शासनाकडून आले आपला निधी नाही शासनाकडे प्रस्ताव पाठवला आहे. फक्त आपल्या मंजूरीची आवश्यकता आहे. आणि गेल्या दोन वर्षात हा निधी लॅब्स झाला आहे. आता पुन्हा तिसऱ्या वर्षी आला म्हणजे अल्पसंख्यांकांसाठी राज्य शासन एवढे संवेदनशील आहे. आपण ह्या ठिकाणी संवेदनशिल दिसत नाही. सरकार बदलल तर आपण अल्पसंख्यांकांच्या बाबतीतील भुमिका चेंज केली का? असा ह्याचा अर्थ होतो. आता विषय आला तर मंजूर करुन घ्यायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

आसिफ शेख आपण बसून जा.

**आसिफ शेख :-**

बहुमताच्या जोरावर आपण वाटेल ते करु शकत नाही. अल्पसंख्यांक समाजामध्ये काय मेसेज जाणार. आपल्या महानगरपालिकेच्या बजेटमध्ये अल्पसंख्यांकासाठी १० कोटीची तरतूद करायला पाहिजे. २० लाखाची आम्हाला गरज नाही पण आम्ही आमच्या बजेटमध्ये त्यामध्ये नविन हेड तयार करु. अल्पसंख्यांक विकास निधी त्यामध्ये ४ कोटी तरतूद करु अशी आपण घोषणा करा ते पण करत नाही.

**भगवती शर्मा :-**

तुम्ही अल्पसंख्यांकाचा विरोधी आहे का? आपण लोक त्याचा विरोध करता का?

**मा. महापौर :-**

भगवतीजी मी स्वतः अल्पसंख्यांक आहे. तुम्ही विचार करुन बोला. मी विरोध करत नाही. तुम्ही बसा नाहीतर मी ठराव मंजूर करते.

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

शासनातर्फे हा विषय आल्यानंतर शासनाच्या भुमिकेच्या विरुध्द आपण काम करता. पंतप्रधान नरेंद्र मोदी तिथे दिल्लीमध्ये बसले आहे. राज्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सगळ्यांची भुमिका एक आहे. आपली भुमिका विरुध्द आहे.

**मा. महापौर :-**

माझी भुमिका विरुध्द नाही. आपण ठराव वाचला नाही. आपण ठराव ऐकला नाही. सगळीकडून ज्यांचे-ज्यांचे पत्र येणार आहेत.

**आसिफ शेख :-**

ह्या विषयावर तुम्हाला काय माहित आहे. दोन मिनिट सांगा. ह्याची मदत कधी होती, कधी प्रस्ताव पाठवला माहित आहे का?

**मा. महापौर :-**

आपण ती मुदत संपायच्या अगोदर पाठवून देऊ.

**आसिफ शेख :-**

मुदत संपून गेली आहे.

**मा. महापौर :-**

मग प्रश्न कुठे आहे.

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

शासनाचे पैसे आहेत. तुमच्या खिशातले पैसे नाही, महानगरपालिकेचे पैसे आहेत.

**मा. महापौर :-**

मग महासभेत मंजूरीला आले आहेत ना.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

५ मायनोरिटी आहेत सगळ्यांचे बघायचे आहे. तुम्ही एक समाजाला धरुन चालू शकत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सर्व समाजाला समाविष्ट करुन घ्यायचे आहे. ५ मायनोरिटी आहेत त्याच्या पंजाबी नाही, पारसी आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

तुम्ही ठराव मांडा नाहीतर मी मंजूर करते.

**आसिफ शेख :-**

हा शासनाचा पैसा आहे. तुम्ही १० कोटीची तरतूद करा तुम्ही अल्पसंख्यांकांचे महापौर आहात. तर तुम्ही महानगरपालिकेच्या आगामी अर्थसंकल्पात १० कोटीची तरतूद करा आम्ही मागणी करतो.

**मा. महापौर :-**

पुढच्यावेळी बजेटमध्ये त्याबाबतीत विचार करु.

**आसिफ शेख :-**

विचार नाही आता रुलिंग देताना प्रत्येक समाजासाठी पाच कोटी म्हणजे ५ अल्पसंख्यांक आहेत तर २५ कोटीची तरतूद करा.

**मा. महापौर :-**

असे सांगून तरतूद होते. आसिफ शेख आपण जुने सभासद आहात आपल्याला माहित आहे.

**आसिफ शेख :-**

तुमच्यापेक्षा निश्चितपणे सिनियर आहे. त्यामुळे मला ह्या विषयाची संपूर्ण माहिती आहे.

**मा. महापौर :-**

आसिफ शेख तुम्ही त्यामध्ये खूप अभ्यास केला असेल मी मान्य करते. मी महापौर आहे. मला दुसऱ्या जातीचे पण बघायचे आहे. जे पण ५ अल्पसंख्याक आहेत सगळ्यांनी मागणी केली आहे. आपण दोघे मिळून नक्कीच त्यासाठी .................

**आसिफ शेख :-**

हा शासनाचा निधी आहे.

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

आता हा निर्णय प्रलंबित ठेवला तर हा निधी मागील दोन वर्षाप्रमाणे लॅब्स होणार आहे. ह्याला सर्वस्व जबाबदारी महापौर गिता जैन आणि संपूर्ण भारतीय जनता पार्टीचे सदस्य राहतील आम्ही निषेध व्यक्त करतो.

**अनिल भोसले :-**

सन्मा. आसिफ शेख मागच्या दोन वेळा लॅब्स झाला. आपण सत्तेत होता मग लॅब्स होण्याचे कारण काय?

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

पिठासीन अधिकारी मला एक प्रश्न विचारायचा आहे हा विषय महासभेच्या मंजूरीसाठी आला का? कोणत्या तरतूदी अन्वये आला आहे. कुठल्या अधिनियमाच्या अंतर्गत आला. २० लाखाच्या कामासाठी महासभेची मंजूरी पहिल्यांदा ह्या इतिहासामध्ये आली.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, शासनाने सांगितले आहे. ठराव करुन पाठवा असे शासनाने सांगितले आहे. मा. महासभेची मंजूरी आवश्यक आहे.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही ह्या विषयावर भांडण लावायला आले आहेत का?

**मा. महापौर :-**

जुबेर इनामदार साहेब तुम्ही विचारता तर त्याचे ऐकून घ्या जवाब नको आहे तर विचारु नका.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

शासनाने महासभेच्या मंजूरीची आवश्यकता आहे असे स्पष्ट पत्र दिले आहे. त्यानुसार महासभेत विषय ठेवला आहे.

**जुबेर इनामदार :-**

बरोबर आहे. अल्पसंख्यांक परिसरातले जितके लोकप्रतिनिधी त्यांना ह्याची माहिती दिली होती का? हा विषय आणायच्या आधी आमची ही ह्याच्यामध्ये मागणी आहे. मिरारोड परिसरातील कब्रस्तानासाठी ख्रिश्चन समाजासाठी आम्ही मागणी केली आहे. तो विषय ह्याच्यामध्ये नाही आहे त्याचा अर्थ काय.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

प्रशासनाने सर्व्हे केला आहे आवश्यकतेनुसार ते केलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाने सर्व्हे केला तर त्यांना तिथे आवश्यकता वाटली नाही का?

**मा. महापौर :-**

जुबेर इनामदार साहेब आम्हाला पण कुठेतरी वाटले की हे घाईघाईत झाले. सगळ्यांना न्याय झाला नाही म्हणून आमचा ठराव तसाच आहे. सगळ्यांची जेवढी जेवढी कामे आहेत ती समाविष्ट करुन ............

**जुबेर इनामदार :-**

माझा विषय पूर्ण होऊ द्या हे करायच्या आधी ह्या सभेमध्ये हा विषय आणायच्या अगोदर सगळी प्रक्रिया पूर्ण केली पाहिजे होती. अशी परिस्थिती गेल्यावर्षी झाली म्हणून फंड लॅब्स झाला. अर्थात अल्पसंख्यांक परिसरामध्ये प्राप्त होणारे अनुदान आपण वापरु शकलो नाही. त्याचे नुकसान परिसरातील अल्पसंख्यांकाना झाला आहे. हा मुद्दा झाला पाहिजे. हा ठराव मंजूर झाला पाहिजे. ठरावाच्या विरोधात मी बोलत नाही. आसिफ शेखनी ठराव मांडला त्याच्या बाजूने मी बोलतो. विषय असा आहे की हा प्रशासनाने द्यायच्या आधी प्रशासन दिशाभूल करते का? त्यांनी प्रत्येक विषय का घेतला नाही. घेतला पाहिजे होता तुम्ही त्याला विरोध का करता? दोन महिन्यानंतरही सभा बोलवलेली आहे. पुढच्या दोन महिन्यांनी सभा बोलवाल तोपर्यंत निविदा प्रक्रिया होणार कधी? राज्यशासन मार्चनंतर अनुदान देणार नाही. आम्ही मांडणारा ठराव तुम्ही मान्य करा. तुम्हा त्याच्या बाजूने व्हा. बहुमताने सर्वानुमते मंजूर होऊ द्या. अल्पसंख्यांक परिसरामध्ये काम होईल. सत्ताधाऱ्यांनी काम केले असे सिध्द होईल. आम्हाला काही हरकत नाही.

**मा. महापौर :-**

तुम्हाला आरोप लावण्याची परमिशन देत नाही.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाचा विषय आहे.

**मा. महापौर :-**

मी पण अल्पसंख्यांक आहे. तुम्ही ते सांगू शकत नाही. तुम्हाला ठराव मांडायचा आहे का की मी हा ठराव मंजूर करु.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाने दिलेले कब्रस्तानाचे विषय विकसित झाले पाहिजेत की नाही झाले पाहिजेत अशी तुमची भूमिका आहे का?

**मा. महापौर :-**

मी काय सांगितले जेवढे पण अल्पसंख्यांक जेवढी पण काम आहेत ज्यांनी-ज्यांनी सुचवली आहेत आमच्याकडे बरेच नगरसेवक असे आहेत ज्यांना त्यांच्या अल्पसंख्यांक एरियामध्ये काम सुचवायची आहेत आणि ते सगळ समाविष्ठ करण्यासाठी मी पुढच्या वेळी प्रस्ताव आणायचे सांगितले आहे. ठराव नामंजूर केलाच नाही.

**सुरेश खंडेलवाल :-**

मॅडम हा विषय घेतलाच नाही पाहिजे ना मग प्रशासनानी तुम्हाला दिला तेव्हा तुम्हाला वाटले की ....

**मा. महापौर :-**

चूक झाली ती सुधारते प्रशासनाने जी चूक केली ती चूक सुधारायचा मौका देतो.

**सुहास रकवी :-**

मॅडम, ह्याच्यापुढे ज्या-ज्या ठिकाणी अल्पसंख्यांक आहे त्यांची नोंद घेऊन त्यानुसार टेंडर काढायला पाहिजे.

**आसिफ शेख :-**

राज्यातील अल्पसंख्याक व बहुल क्षेत्रात मुलभुत नागरी सुविधा उपलब्ध करून देणेकामी शासन निर्णय क्र. क्षेविका-२०१५/प्र.क्र.७६/का.९, दि.१८/०६/२०१५ अन्वये अल्पसंख्याक क्षेत्रामध्ये मूलभूत सुविधा पुरविणे कामी भाईंदर (प.) डोंगरी येथे कब्रस्थानासाठी सी.सी. पदपथाचे व कुंपनभिंतीचे बांधकाम करणे व भाईंदर (प.) येथील दाऊदी बोहरा कब्रस्थानासाठी सिपारा रूमचे व सी.सी. पदपथाचे बांधकाम करणे या कामाबाबत अंदाजपत्रके खालील प्रमाणे प्रस्ताव तयार करून मा. जिल्हाधिकारी, ठाणे मार्फत राज्य शासनाकडे प्रस्ताव मंजूरीस्तव पाठविण्यात आला होता. परंतू राज्य शासनाच्या अल्पसंख्यांक विभागाकडून पत्र क्र. क्षेविका-२०१५/प्र.क्र.७६/का.९, दि.२०/१०/२०१५ अन्वये सदरच्या प्रस्तावास मा. महासभेची मंजूरी आवश्यक असल्याचे संदर्भिय शासन निर्णयानूसार कळविले असल्याने सदरचा प्रस्ताव मा. महासभेपुढे अवलोकनार्थ व मंजूरीसाठी सादर करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) डोंगरी येथे कब्रस्थानासाठी सी.सी. पदपथाचे व कुंपनभिंतीचे बांधकाम करणे. | रू. १३,५६,८००/- |
| २ | भाईंदर (प.) येथील दाऊदी बोहरा कब्रस्थानासाठी सिपारा रूमचे व सी.सी. पदपथाचे बांधकाम करणे | रू. ९,८२,५००/- |

वरील प्रमाणे सदर दोन्ही विकास कामांचा खर्च रु.२३,३९,३००/- इतका आहे. सदर कामासाठी शासनातर्फे महापालिकेस रु.२०,००,०००/- इतके अनुदान उपलब्ध करून दिले जाणार असून रु.३,३९,३००/- एवढी उर्वरीत अधिकची रक्कम मिरा-भाईंदर महानगरपालिका खर्च करणार आहे. तरी, वरील प्रमाणे प्रस्तावाचे अवलोकन होऊन मा. महासभेची मंजूरी मिळावी तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका आगामी अर्थसंकल्प २०१६-१७ या वर्षासाठी व दरवर्षी अल्पसंख्याक विकास निधी याप्रमाणे स्वतंत्र हेड तयार करुन त्यासाठी सर्व अल्पसंख्याक मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, पारसी, पंजाबी आदी रु. २५ कोटीची तरतुद करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब ठराव मतदानास घ्या.

**जुबेर इनामदार :-**

या ठरावात माझी सुचना आहे. मिरारोड (पूर्व) मुस्लीम कब्रस्तानमध्ये पेव्हर ब्लॉक व मिरारोडमध्ये (पूर्व) मधील ख्रिश्चन दफनभूमीमध्ये जमिन पक्या स्वरुपाची करण्यासाठी या ठरावामध्ये समावेश करण्यात यावे अशी मी सूचना मांडत आहे.

**मर्लिन डिसा :-**

माझे अनुमोदन आहे.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलते, माझी एक सूचना आहे. आता आसिफ शेख ह्यांनी ठराव मांडला आणि अल्पसंख्यांकांच्या संदर्भातील आपण केंद्र शासनाकडून आलेला निधी तर माझी अशी सूचना मागणी आहे. मागासवर्गीयांसाठी जो निधी आहे, तो आजपर्यंत किती आलेला आहे आणि याच्यानंतर कुठे वापरलेला आहे चाळीसाठी आहे, झोपडपट्टीसाठी आहे.

**मा. महापौर :-**

हा विषय नाही. सचिव साहेब मतदान घ्या.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, विषय ऐकून तर घ्या. योजनेमध्ये मागासवर्गीयांसाठी आहे की नाही. माझ्या माहितीप्रमाणे आहे. तुमच्या माहितीप्रमाणे आहे की नाही आणि आजपर्यंत किती आली आणि कुठल्या एरियामध्ये वाटल्या गेल्या, किती शौचालय बनवले? तो पैसा चाळीमध्ये, झोपडपट्टीमध्ये किती वापरला गेला? आणि केंद्र शासन, महाराष्ट्र शासनाच्या याची आम्हाला पुढच्या महासभेत माहिती द्यावी ही माझी सूचना आहे.

**मा. महापौर :-**

प्रशासनाला आपण लेखी द्या, प्रशासन आपल्याला उत्तर देणार.

**अनिल भोसले :-**

काशिमिरा परिसरामध्ये जो अल्पसंख्यांक समाज आहे या विषयावर मी अनेक वेळा पालिकेला पत्रव्यवहार केला आहे. माझ्याकडे मुन्शी कम्पाऊंड, मिरा गाव, ए.जी नगर, वेस्टर्न पार्क मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या आहे. त्या ठिकाणी कब्रस्तान एकच आहे. त्या ठिकाणी कब्रस्तान संदर्भात आणि शासनाचा अल्पसंख्याक जो आलेला निधी आहे त्या निधीमध्ये वर्ग करुन आम्हाला काशिमिरा मध्ये जो मोठा समाज आहे त्याला मिळावा आणि पूढच्या महासभेत विषय घेतला तर सगळे अल्पसंख्याक समाज मुस्लीम समाज पर्टिक्युलर भाईंदर इस्ट किंवा वेस्टला नाही पूर्ण मिरा रोड शहरामध्ये आहे. त्याठिकाणी मोठा मुस्लीम समूदाय आहे. त्यांनाही त्यांच्यात समावेश करुन त्यांना न्याय मिळाला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

**आसिफ शेख :-**

तुमचे एवढे प्रेम आहे मग तुम्ही ठरावाला समर्थन करायला पाहिजे होत. कथणी वेगळी करता आणि करणी वेगळी करता. हे बेगंडी प्रेम दाखवू नका.

**भगवती शर्मा :-**

भोसले साहेब तुमची सूचना आहे का आमच्या ठरावामध्ये. सूचना करा. आम्ही घेतो. भोसले साहेबांची सूचना आमच्या ठरावात समाविष्ठ करावी.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११३ करीता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सूचक रोहिदास पाटिल अनुमोदन प्रशांत केळूसकर. दूसरा ठराव सूचक आसिफ शेख अनुमोदन सुरेश खंडेलवाल. त्यांच्यात जुबेर इमानदार यांची सूचना आहे दस-या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात

असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ कोणी? पहिल्या ठरावाचे सूचक रोहिदास पाटिल यांच्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ कोणी?

**मा. महापौर :-**

सूचक रोहिदास पाटिल यांच्या ठरावाच्या बाजुने ३९ विरोधात ३४ इतकी मते पडली आहेत. सूचक श्री. रोहिदास पाटिल यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ११३ :-**

राज्यातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात मुलभुत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्रविकास कार्यक्रमांतर्गत विकास कामांबाबत.

**ठराव क्र. ८४ :-**

राज्यातील अल्पसंख्यांक व बहुल क्षेत्रात मुलभुत नागरी सुविधा उपलब्ध करुन देणेकामी शासन निर्णय क्र. क्षेविका-२०१५/प्र.क्र.७६/का.९, दि. १८/०६/२०१५ अन्वये अल्पसंख्याक क्षेत्रामध्ये मुलभूत सुविधा पुरविणे कामी संपूर्ण मिरा-भाईंदर शहरातील अल्पसंख्याक वस्त्यांमध्ये करावयाच्या कामांचे प्रस्ताव तयार करुन एकत्रित प्रस्ताव पुढील महासभेपुढे सादर करण्यात यावा.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शरद केशव पाटील | १ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | निरंक |
| २ | पाटील रोहिदास शंकर | २ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | |
| ३ | कोठारी सुमन रमेश | ३ | ध्रुवकिशोर पाटील | |
| ४ | सिमा कमलेश शहा | ४ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ५ | जैन गिता भरत | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ६ | अरोरा दिपीका पंकज | ६ | असेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ७ | रावल भगवती जयशंकर | ७ | शिल्पा भावसार | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ९ | मेघना दिपक रावल | ९ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| १० | शर्मा सुनिला सत्येंद्र | १० | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ११ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | ११ | पाटील वंदना विकास | |
| १२ | सुजाता रविकांत शिंदे | १२ | शबनम लियाकत शेख | |
| १३ | पाटील प्रेमनाथ गजानन | १३ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १४ | सिंग मदन उदितनारायण | १४ | विराणी रेखा अनिल | |
| १५ | कांगणे यशवंत ठकाजी | १५ | पुजारी कांचना शेखर | |
| १६ | अनिल बाबुराव भोसले | १६ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १७ | कासोदरीया अश्विन श्यामजी | १७ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १८ | जैन दिनेश तेजराज | १८ | वंदना रामदास चक्रे | |
| १९ | जैन रमेश धरमचंद | १९ | अनिता जयवंत पाटील | |
| २० | निलम हरिश्चंद्र ढवण | २० | गोविंद हेलन जॉर्जी | |
| २१ | तारा विनायक घरत | २१ | काझी रशीदा जमील | |
| २२ | शुभांगी महिन कोटियन | २२ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २३ | जयमाला किशोर पाटील | २३ | इनामदार जुबेर | |
| २४ | परमार अनिता भरत | २४ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २५ | पाटील प्रणाली संदिप | २५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २६ | गावंड मंदाकिणी आत्माराम | २६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | २७ | सामंत प्रमोद जयराम | |
| २८ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | २८ | रकवी सुहास माधवराव | |
| २९ | प्रविण मोरेश्वर पाटील | २९ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| ३० | शाह राकेश रतिशचंद्र | ३० | खण्डेलवाल सुरेश | |
| ३१ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३१ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| ३२ | केळुसकर प्रशांत नारायण | ३२ | डॉ. आसिफ शेख | |
| ३३ | भोईर भावना राजू | ३३ | भोईर कमलेश यशवंत | |
| ३४ | भोईर राजू यशवंत | ३४ | रविंद्र भिमदेव माळी | |
| ३५ | जाधव मोहन महादेव | | | |
| ३६ | मुन्ना सिंग | | | |
| ३७ | ॲड. रवि व्यास | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | दिप्ती शेखर भट | | |
| ३९ | मयेकर सरस्वती रजनीकांत | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**आसिफ शेख :-**

महापौर मॅडम आम्ही या सालाबादाप्रमाणे २५ कोटीची तरतुदीची मागणी केली आहे अर्थसंकल्पात दरवर्षी करावी. आपण अल्पसंख्याकचे महापौर आहात आणि आपला एक मॅसेज जाऊ द्या की आसिफ शेख यांनी जो ठराव २५ कोटीची मागणी केली दरवर्षी तर आपण ५० कोटी करा.

**नगरसचिव :-**

महापौरांच्या परवानगीने जेवनानंतर सभा कामकाजास सुरुवात होत आहे. प्रकरण क्र. ११४, जे.एच.पोद्दार मार्ग नो पार्किंग, नो फेरिवाला म्हणून घोषित करणे.

**हंसुकुमार पांडे :-**

महापौर मॅडम आम्हाला एक बोलायंच आहे. जेसलपार्कची एन्ट्री आहे ना तिकडून शिवसेना शाखा पयैत आम्हाला नो हॉकर्स झोन करुन द्या.

**रवि व्यास :-**

मिरा भाईंदर क्षेत्रातील भाईंदर (प.), शिवसेना गल्ली, जे.एच. पोद्दार मार्ग मोठ्या प्रमाणात वर्दळीचा व रहदारीचा आहे. सदर परिसरात असलेल्या शाळेमुळे या मार्गावर विद्यार्थ्यांची सतत रेलचेल आहे. सदरचा रस्ता अतिशय अरुंद असुन सदर परिसरातील गणेश देवल नगर परिसरात जवळ जवळ ५०,००० पेक्षा लोकवस्ती आहे. सदर परिसरातील नागरीकांकरीता जे.एच. पोद्दार मार्ग ये-जा करण्याकरीता एकमेव मार्ग असल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात फेरीवाले बसत असुन नागरीक आपली वाहने रस्त्यावर पार्किंग करीत असल्यामुळे सदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहनांची कोंडी होत आहे. यामुळे सदर रस्त्यावर वाहनांना तसेच नागरीक व विद्यार्थ्यांना ये-जा करण्यास अतिशय त्रासदायक होत आहे. सदरचा रस्ता अतिशय अरुंद असून सदर रस्त्याचे रुंदीकरण होणे शक्य नाही.

सदर परिसरातील रस्त्यावर बसणाऱ्या फेरीवाल्यांमुळे तसेच वाहनांच्या पार्किंगमुळे वाहतुकीस व नागरीकांना होणारी अडचण लक्षात घेता जे.एच.पोद्दार रस्ता व जे.एच.पोद्दार क्रॉस रस्ता हा नो पार्किंग झोन व ना फेरीवाला क्षेत्र घोषित करण्यात येत आहे व प्रत्येक नगरसेवकांचे त्यांच्या त्यांच्या प्रभागातील सदर विषयासंदर्भात मोठ्या प्रमाणात तक्रारी अर्ज प्राप्त होत आहेत. याकरीता सदर विषय संदर्भात सर्वपक्षीय गटनेते यांची बैठक आयोजित करुन शहरातील प्रत्येक क्षेत्रातील रस्त्यांबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे योग्य होईल तसेच सर्व सदस्यांनी सदर विषयाबाबत मा. महापौर यांना आपआपल्या प्रभागातील समस्यांबाबत लेखी निवेदन सादर करावे व त्या संदर्भात ठरलेला निर्णयासाठी वरील विषय मंजुर करुन बाकी शेष विषय पुढील सभेत सादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**प्रतिभा तांगडे पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

महापौर मॅडम इस विषय के अंदर मे सबसे पहले तो प्रशासन की तरफ से कोई गोषवारा नही है । जिसके कारणसे किसीभी सदस्यको वस्तुस्थिती वहाँपे क्या है क्या नही मालुम नही । दुसरा प्रश्न है मेरा की सन २००८ की महासभा के अंदर में रवि व्यास जी १९-०७-२००८ की महासभा में जे.एच. पोद्दार स्कुल गली का जो रस्ता है वो ऑलरेडी नो फेरीवाला क्षेत्र घोषित किया हुआ है । तो इस विषय के अंदर में यह विषय मेंरे ख्यालसे लेने की कोई औचित्य नही रह जाता की जो की ऑलरेडी किया हुआ था कि वो नो फेरिवाला क्षेत्र का वहाँपे उसी हिसाब से कार्यवाही होनी चाहिए । दुसरी बात यह है की इन्होंने एक प्रस्ताव के अंदर में यह भी घोषण कि है की उसके अंदर में जो वाहतुक की अडचण होती है जिसके लिए वहाँपे नो पार्किंग क्षेत्र भी घोषित किया जाए । महापौर मॅडम मैं आपके माध्यमसें प्रशासन को पूछना चाहता हूँ की महासभा को नो पार्किंग झोन करनेका अधिकार है क्या?

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. अधिकार आहे. महासभेला अधिकार आहे ते.

**भगवती शर्मा :-**

पाणपट्टे साहब कोई जानकारी लेके आप कभीभी सूचना दिजीए । क्या होता है पिछली बार भी ऐसी ही बात हुई थी । फेरीवाला झोन के अंदर में फेरीवाला मुद्दा उठा था आप कछ भी बोल दिए थे । आज ताक इस महासभाके अंदरमें इस बाबत में कभी ठराव हुआ? पार्किंग नो पार्किंग झोन का आपको अधिकार है क्या?

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

महासभा को अधिकार है ।

**भगवती शर्मा :-**

आज तक कभी हुआ है इस महासभामें?

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

पेहले क्या हुआ मालुम नहीं । महासभा को अधिकार है ।

**भगवती शर्मा :-**

आप बताइयें कहाँपे है । आज तक इसलिए नही हुआ क्योंकी अधिकार नहीं है । यह होता है की, महासभा कौन है करके यहाँपे जैसे ट्राफिक पोलिस है कलेक्टर के आदमी रहते है, एस पी के आदमी रहते है । वो सब एक जॉइन्ट मिटींग करके प्रशासनके साथमें महापौर द्वारा निश्चित करते है । कि कौनसी एरीआ के अंदर में क्या? और उसकी पब्लीकेशन होती है सार्वजनिक रुपसें उसके बाद के अंदरमें वहाँसे सजेशन ऑब्जेक्शन आते है उसके बादमें वो निर्णय कलेक्टर के पास जाता है और जिल्हाधिकारी कार्यालय में से जिल्हाधिकारी घोषित करता है । ऐसी घोषित की हुई यादी अभी मेरे पास में है । जो मैं आपको बता सकता हूँ । दि. १३/०५/२०१० आप इसको पढेंगे ना तो जानकारी हो जाएगी बिना जानकारी आप हर चिज मैं ऐसे मत बोलिए की यह अधिकार है । इसके अंदर पढेंगे ना गॅझेट है पुरा और जिल्हाधिकारी ने घोषित किया है । मिरा भाईंदर कें अंदर भाईंदर वेस्टमें, इस्टमें, मिरा रोड के अंदरमें कौनकौनसे क्षेत्र पार्किंग क्षेत्र है। कौन कौनसे नो पार्किंग क्षेत्र है। तो मेरेको यह बताईयें की जो चिज हमको यहाँपे मालुम ही नही की हम कर सकते है की नही कर सकते है तो वो विषय का मतलब क्या है ।

**रवि व्यास :-**

महापौर मॅडम स्टेप नंबर वन यह है की. महासभा में मंजूर करने के बाद में यह प्रस्ताव आर.टी.ओ के पासमें आगे की कारवाई करने के लिए भेजा जाता है । जब तक महासभा में इस विषय को मंजुरी नही मिलेगी किसी भी क्षेत्र को नो पार्किंग करनेके लिए तब तक आर.टी.ओ वाले या कोई भी आगे के अधिकारी इसपें कारवाही नही कर सकते ।

**भगवती शर्मा :-**

व्यासजी मेरा उसमें कोई दुमत नही है की वहाँपे पार्किंग झोन नही होना चाहिए । एक विषय बताता हूँ, लेकीन उसकी वैधता की बात करता हूँ मैं जैसे आपका यह जो प्रस्ताव है ऐसे प्रस्ताव आप ने उस ठराव मैं भी लिए थे । ऐसे प्रस्ताव आने के बाद में, जैसें महासभा में एक पत्र जैसे महापौर को भी लिखना बादमें महापौर के अंदर में मिटिंग लगती है और उसके लेवल के अंदरमें यह जो कमिटी होती है यह कमिटी एक निर्णय लेती है वो निर्णय के बादमें भी वो सजेशन ऑब्जेक्शन पब्लीक में दि जाती है । क्योंकी पब्लिक से भी पुछा जाता है । की उस एरीआ के अंदरमें क्या अडचण है क्या नही है उसके बाद में होता है । मेरा इसमें कोई दुमत नही है । की वहाँपे नही होना चाहिए । होना चाहिए क्योंकी वो आज शहर की बहोत पुरानी वस्ती है । वहाँपे ट्राफिक ज्यादा हो रहा है। २००८ के अंदर में हमने ठराव भी किया था कि वो नो फेरीवाला झोन है । लेकिन एक कायदे से कानुन के दृष्टीसे उचित मजबूती से मिले ऐसा काम होना चाहिए वही मैं प्रशासनसे पूछता हूँ । २००८ के अंदरमें ऑलरेडी वो नो फेरीवाला क्षेत्र हुआ है । और रही बात उसको अगर नो पार्किंग झोन करना है तो उसके एक प्रोसेस के हिसाबसें चलके वो चाहे कौनसा भी एरिआ हो उसके हिसाबसें वो किया जाए ।

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

शर्मा साहेब त्यासाठीच आपण गटनेत्यांची बैठक बोलवणार आहे. त्यात आर.टी.ओ चे इन्सपेक्टर येणार आहेत. सगळयांना बोलवणार ती चर्चा करुनच निर्णय घेणार आहोत आपण.

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

प्रेमनाथजी पाटिल मै आपको बता देता हूँ यह सार्वजनिक विषय है यह सिर्फ महासभा का विषय नही है । यह शहरका विषय है । यह प्रोसेस है इसका सार्वजनिक रुपसें एक पब्लिकेशन किया जाता है । जिल्हाधिकारी की तरफसे और वहाँ से सजेशन ऑब्जेक्शन उनका भी मिलाया जाता है । ठिक है हम भी जनताके प्रतिनिधी है हम भी देंगे । लेकीन पुरी जनता के अंदरमें नोटिस के माध्यम से पब्लिकेशन करके उनके सत्य प्रस्ताव मंगाये जाते है उसके बाद वो पी वन, पी टु, पार्किंग झोन, नो पार्किंग झोन वो किया जाता है ।

**जुबेर इनामदार :-**

ती प्रोसेस आहे का? तशी प्रोसेस असेल तर मग हा विषय विषयपटलावर आणायला नाही पाहिजे होता.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

त्यांनी घेतलेला आहे विषय हा.

**जुबेर इनामदार :-**

ठिक आहे. सत्ताधाऱ्यांचा उद्देश चांगला आहे ते करावे. कधी कधी तांत्रिक बाबी चुकतात तर कमीत कमी तसे काही असेल तर त्याची माहिती द्या. विषयपटलावर की हा विषय आपण अशा प्रकारे केल्यानंतरच महासभेसमोर आणायला पाहिजे आणि त्याला मंजुरी तुम्ही द्या. सर्वानुमते मंजुरी द्या असं प्रशासनने आपली भूमिका स्पष्ट करावी तसं निवेदन द्या ना तुम्ही.

**वंदना चक्रे :-**

महापौर मॅडम विषय असा आहे की आत्ताच भगवती शर्मा आणि जुबेर इनामदार बोलून गेले. मिरा भाईंदर महानगरपालिकाने फेरिवाला समिती गठीत केली आहे.

**मा. महापौर :-**

आपण बसून जा.

(सभागृहात गोंधळ)

**प्रशांत दळवी :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो या ठरावाशी मी सहमत आहे. परंतु सन्मा. सदस्यांच्या ज्या काही तक्रारी असतील त्या महापौरांकडे देण्यात याव्यात. माझं असं म्हणण आहे महापौर मॅडम, या सूचनेच्या आधारावर आपण रुलिंग द्यावी की ना फेरिवाला क्षेत्र हे २००८ मध्ये पारित झाले आहेत. परंतु आज परत हा विषय विषयपटलावर आलेला आहे. महापौर मॅडम, ज्या-ज्या क्षेत्रामध्ये २००८ मध्ये ज्या-ज्या प्रभागामध्ये ना फेरिवाला क्षेत्र केलेले आहे त्या ठिकाणी लाखो रुपये आज आपण पालिका प्रशासनातर्फे खर्च करतो. तेथे बोर्ड लावण्यात येतात परंतु त्या ठिकाणी कुठल्याही प्रभाग अधिका-यांमार्फत प्रशासनामार्फ कारवाई होत नाही. त्याबद्दलचे काय म्हणणे आहे. आयुक्त महोदय, की आपण फक्त ठराव करायचे इकडे त्यांची अंमलबजावणी करायची नाही अशी कित्येक असे ठराव आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये गेले २ वर्षापासून भिजत पडलेले आहे. पण जर ठरावाची अंमलबजावणीच होणार नसेल, कच-याच्या टोपलीत फेकले जाणार असेल तर या सभागृहात महापौर मॅडम आम्ही एक नगरसेवक म्हणून लोकप्रतिनिधी इथे येऊन फक्त बोंबाबोंब करायची काय अर्थ याला. महापौर मॅडम आज तुमच्याकडून मला रुलिंग हव आहे या अनधिकृत बांधकामाबद्दल जे काही चाललेले आहे. ते अतिक्रमण विभागात पथकाच्या प्रमुखाला इथे डायसवरती बोलवण्यात यावे आणि सविस्तर आपण रुलिंग द्यावी की २००८ ला जे पारित झालेले आहे जे तुम्ही आता केंद्र शासन ज्या वेळेला केंद्रशासनाचा जी.आर आलेला आहे की तुम्ही फेरिवाला क्षेत्र जाहिर करा नव्याने परंतु गेली २ वर्ष आपण काहीच करत नाही. त्यामध्ये आणि अस असलं तरी २००८ मध्ये जो महासभेने ठराव पारित केलेला आहे. त्यानुसार ज्या-ज्या क्षेत्रामध्ये ज्या-ज्या प्रभागामध्ये हे फेरिवाला क्षेत्र आहे त्या-त्या प्रभागाचे प्रभाग अधिकारी, आयुक्त महोदय आणि त्या अतिक्रमण विभागाच्या पथकाला इकडे बोलवण्यात यावे आणि त्या प्रभागावरती उद्यापासून कारवाई झाली पाहिजे आणि जर नसेल कारवाई होणार तर महापौर मॅडम, संबंधित प्रभाग अधिकारी आणि त्या अतिक्रमण विभागाच्या पथकाला या सभेतून निलंबित करण्यात यावे अशी मी तुम्हाला कळकळीची विनंती करतो.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल भोसले :-**

महापौर मॅडम, गेली २-३ वर्षे नगरसेवक झाल्यापासून मी अनेकवेळी आपल्याला कळकळीची विनंती करतो. काशिगाव या ठिकाणी आपण एक मोठ मार्केट उभं केल सिल्वर सरिता त्या मार्केटमध्ये एकही फेरिवाला बसत नाही. काशिगाव म्हणा किंवा हायवेच्या रस्त्याला लगत असलेल्या गेल्या वेळी कॅटलिन परेरा मॅडम महापौर होत्या त्या वेळी ही मी त्यांना विनंती केली होती, अनेक वेळा या महासभेमध्ये विनंती करुन एक वेळाही त्या ठिकाणी कारवाई झाली नाही. अनेक लोक त्या ठिकाणी हायवेला फुटपाथ घेऊन बसतात अनेकांचे बळी गेले त्यानंतर ही प्रशासनने सिरियसली घेतले नाही. तिसरा मुद्दा आपण जे फेरिवाला क्षेत्र घोषित केले आहे ते क्षेत्र सोडून असा एकही प्रभाग नाही की पूर्ण प्रभागामध्ये फेरिवाला आपल्या मनमर्जीप्रमाणे बसतात आणि त्याला पांघरुण जे घालतय आपण जे कॉन्ट्रॅक्ट दिले आहेत जे कॉन्ट्रॅक्टर आहेत ते कॉन्ट्रॅक्टर सगळ्या कडून पैसे वसूली करतात. म्हणजे आपण महानगरपालिकेने जे धोरण निश्चित केलेले आहे ते फेरिवाला क्षेत्रात अनलिगल म्हणजे कुठेही बसतात त्या ठिकाणी पैसे घेऊन महानगरपालिका कॉन्ट्रॅक्टर आपले पैसे घेतात आणि पैसे घेतल्यामुळे ते मनमर्जीप्रमाणे कुठेही बसतात. कुठली बिल्डींग नाही कुठली सोसायटी नाही. माझी महासभेला एक विनंती आहे. महापौर मॅडम, आपणाला कळकळीची विनंती आहे या लोकासांठी महासभेमध्ये अनेक वेळा विषय आले अनेक वेळा चर्चा झाली पण यामधून आतापर्यंत कधीही मार्ग निघालेला नाही. माझी सर्व सदस्यांच्या वतीने विनंती आहे असा एकही नगरसेवक नसेल जो या फेरिवाल्यांकडून त्रस्त आहे. फेरिवाल्यांना उद्ध्वस्त करा अस आमचं म्हणणे नाही. फेरिवाल्यांनी आपण जे निश्चित धोरण ठरवून दिलेल आहे की हा फेरिवाला क्षेत्र आहे हा रोडवरती फेरिवाला क्षेत्र आहे. या ठिकाणी फेरिवाल्यांनी बसावे त्या ठिकाणी बसावे आम्ही त्यांच स्वागत करु पण पूर्ण प्रभागामध्ये ज्या-ज्या ठिकाणी नगरसेवक नविन रोड बनवतात त्याच्या तिस-या दिवशी फेरीवालेचे ठेले लागलेले असतात. म्हणजे त्यांना कोणाची भीती नाही आणि प्रशासन म्हणुन त्यांची तर बिलकुल भीती नाही. ज्या ज्या वेळेला आपण कारवाई करायला सांगतो आपले अधिकारी फेरिवाल्यांना पहिल्या दिवशी जाऊन सांगतात उद्या आम्ही येणार बसू नका म्हणून इललिगल बांधकाम तोडण्यासाठी आपणाला पोलिस मिळतात बाकी या ठिकाणी महानगरपालिका मध्ये एखादा मोर्चा घेऊन गेला तर अधिकारी आपले कपडे सांभाळून पोलिसांना घेऊन घेराव करुन बसतात. फेरीवाले उठविण्यासाठी यांना पोलिस मिळत नाही. आयुक्त साहेब आपणाला माझी एक विनंती आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

पुन्हा पुन्हा तोच विषय चर्चेसाठी...........

**अनिल भोसले :-**

पुन्हा पुन्हा नाहीए साहेब. आयुक्त साहेब ज्या लोकांनी तीन वर्षामध्ये कारवाई म्हणजे कामच केलं नाही यांच्यावर तुम्ही कारवाई करणार का? काय कारवाई करणार आणि जे लोक बळी झालेत त्यांना ३०४ प्रमाणे तुमच्या अधिका-यांना आरोपी बनवणार का? मी एक महासभेमध्ये बोललो नाही मॅडम सतत तीन वर्षापासून बोलत आहे. तुमचे हे मिरा रोडचे नगरसेवक बोलतायेत. अनेक नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक नगरसेवक बोललेत गेल्या महापौरांच्या वेळी पण मी विनंती केली होती आणि आज ही कळकळीची विनंती आहे. जे बळी झालेत त्यांना जबाबदार कोण? या अगोदरही आयुक्त साहेब होते या अगोदरही प्रभाग अधिकारी होते. अतिक्रमण डिपार्टमेंट ही सिरीयस नाही. कुणी मरतय याचही सिरीयस नाही. जे मार्केट बनवले आहे जे पैसे खर्च केलेत आपण त्या ठिकाणी काशीगाव मध्ये सिल्वर सरीता हे मार्केट आहे ते कशासाठी बांधले आहे. म्हणजे महानगरपालिकाने जे गोरगरीब आदिवासी लोक आहेत त्या लोकांच्या अंगावर कपडे नाहीत. घालायला साड्या नाहीत. ते लोक साहेब टॅक्स भरतात आणि जे भरत नाही त्यांचे भांडे आपण बाहेर काढतो रिकव्हरीचा आपण प्रयत्न करतो त्या लोकांचा टॅक्स मिळतो म्हणून बांधकाम केले कशासाठी केले कशासाठी? ते सिल्वर सरीता मार्केट बनवले कशासाठी बनवले आपण तीन वर्षापासून धुळ खात पडलेले आहे. काशीगांव मध्ये रस्त्यावरती जायला लोकांना जायला जागा नाही. आमचे प्रभाग अध्यक्ष कमलेश भोईर त्या प्रभाग अध्यक्षांनी त्यांनी अनेकवेळा महासभेमध्ये आयुक्ताकडे अनेकवेळा पत्रव्यवहार केले आणि शिष्टमंडळ येऊन भेटलेले आहे. ही सत्यपरिस्थिती आहे पण कारवाई होत नाही. मॅडम महापौर म्हणुन आपल्याला विनंती आहे या अधिका-यांचे गोडलगामचे घोडे झाले आहेत या अधिका-यांवर कुणाचे बंधण राहिलेले नाही यांना कुणाची भीती राहिलेली नाही. यांना जोपर्यंत पनिशमेंट मिळत नाही, एखादा अधिकारी जापर्यंत जेलमध्ये जात नाही, एखादा मयत झाला त्याची विधवा बाईचे घर चालत नाही त्यांची मुले शिक्षणापासून पण वंचित राहतात पण या अधिका-यांना कुणाचे काही पडलेले नाही. मॅडम हा तीन वर्षाचा प्रश्न आहे आजचा नाहीए एका महासभेला होऊ शकत नाही, २ महासभेला होऊ शकत नाही. एका वर्षामध्ये होऊ शकत नाही. ३-३ वर्ष होत नाही. प्रत्येक आयुक्त म्हणतो कारवाई होते, कारवाई होईल गेल्या वेळी महापौर मॅडम होत्या त्या बोलल्या कारवाई होईल दिवाळीच्या नंतर होईल ३ दिवाळी झाल्या तरी अजून कारवाई झाली नाही. आणि आता ३ वर्षामध्ये जे लोक रुळली आहे त्याला जबाबदार कोण? याचे उत्तर मला हवे आहे. आयुक्त साहेब आज आपण आयुक्त म्हणून या महासभेमध्ये आहात आणि महापौर मॅडम कमीत कमी या महासभेमध्ये जे बेजबाबदार अधिकारी आहेत एकातरी अधिका-यावर या महासभेमध्ये कारवाई व्हावी अस रुलिंग द्यावे अशी माझी विनंती आहे. जोपर्यंत हे जेलमध्ये जात नाही घरी बसत नाही लोकांच्या मयतांची यांना काळजी नाही. या ठिकाणी येवून ए.सी. मध्ये बसून मस्त जे चाललेले प्रशासनचे जे काम आहे ना हे कुठेतरी थांबवायला पाहिजे. पानपट्टे साहेब मला उत्तर हवे आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

कारवाई चालु आहे. ठोस कारवाई करु असे महासभेला आश्वासन केलेले आहे. १५ दिवसांत ठोस कारवाई करणार आहोत.

**अनिल भोसले :-**

आश्वासन नको. राजकारणी लोकांचे काम तुम्ही करु नका. आश्वासन ३ वर्षापासून ऐकतो आहे.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

आपल्याला प्रशासनाने उत्तर दिलेले आहे. मॅडम हा विषय घेऊ नये हा न संपणारा विषय आहे. अख्खा दिवस पण पूर्ण पडणार नाही. जर १५ दिवसात यांच्यावर कारवाई झाली नाही तर आपण हा खास महासभा लावून हा विषय एकच घेऊन सर्व सदस्यांना चर्चा करायला वेळ मिळायला पाहिजे असं मी तुम्हाला विनंती करतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

चर्चा से काम नही चलेगा रिझल्ट चाहिए। तुम्ही काय बोलले माहित आहे का की एक मिटींग लावूया आणि सगळ्या सदस्यांनी चर्चा करुया. चर्चा नाही रिझल्ट पाहिजे.

(सभागृहात गोंधळ)

**वंदना चक्रे :-**

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलते माझा विषय असा आहे की, आपली फेरिवाला या विषयावरती चर्चा झालेली आहे. केंद्र शासनाची योजना आहे आणि मिरा भाईंदर महानगरपालिकामध्ये ही समिती गठित झाली आहे.

**मा. महापौर :-**

आपल्याला पहिलेच सांगितले मी समितीवर बोलु देणार नाही. मी रवि व्यासने मांडलेला ठराव मंजूर करते आणि प्रशासनाला तशी रुलिंग देते की यावर ॲक्शन घ्यावी आणि १५ दिवसांत ते क्लिअर करावे. जे काही प्रॉब्लेम आहे ते १५ दिवसात वॉर्ड ऑफिसरांना तशी रुलिंग देते. आणि ते तसे करावे लागणार सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ११४ :-**

जे.एच.पोद्दार मार्ग नो पार्किंग, नो फेरिवाला म्हणून घोषित करणे.

**ठराव क्र. ८५ :-**

मिरा भाईंदर क्षेत्रातील भाईंदर (प.), शिवसेना गल्ली, जे.एच. पोद्दार मार्ग मोठ्या प्रमाणात वर्दळीचा व रहदारीचा आहे. सदर परिसरात असलेल्या शाळेमुळे या मार्गावर विद्यार्थ्यांची सतत रेलचेल आहे. सदरचा रस्ता अतिशय अरुंद असुन सदर परिसरातील गणेश देवल नगर परिसरात जवळ जवळ ५०,००० पेक्षा लोकवस्ती आहे. सदर परिसरातील नागरीकांकरीता जे.एच. पोद्दार मार्ग ये-जा करण्याकरीता एकमेव मार्ग असल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात फेरीवाले बसत असुन नागरीक आपली वाहने रस्त्यावर पार्किंग करीत असल्यामुळे सदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहनांची कोंडी होत आहे. यामुळे सदर रस्त्यावर वाहनांना तसेच नागरीक व विद्यार्थ्यांना ये-जा करण्यास अतिशय त्रासदायक होत आहे. सदरचा रस्ता अतिशय अरुंद असून सदर रस्त्याचे रुंदीकरण होणे शक्य नाही.

सदर परिसरातील रस्त्यावर बसणाऱ्या फेरीवाल्यांमुळे तसेच वाहनांच्या पार्किंगमुळे वाहतुकीस व नागरीकांना होणारी अडचण लक्षात घेता जे.एच.पोद्दार रस्ता व जे.एच.पोद्दार क्रॉस रस्ता हा नो पार्किंग झोन व ना फेरीवाला क्षेत्र घोषित करण्यात येत आहे व प्रत्येक नगरसेवकांचे त्यांच्या त्यांच्या प्रभागातील सदर विषयासंदर्भात मोठ्या प्रमाणात तक्रारी अर्ज प्राप्त होत आहेत. याकरीता सदर विषय संदर्भात सर्वपक्षीय गटनेते यांची बैठक आयोजित करुन शहरातील प्रत्येक क्षेत्रातील रस्त्यांबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे योग्य होईल तसेच सर्व सदस्यांनी सदर विषयाबाबत मा. महापौर यांना आपआपल्या प्रभागातील समस्यांबाबत लेखी निवेदन सादर करावे व त्या संदर्भात ठरलेला निर्णयासाठी वरील विषय मंजुर करुन बाकी शेष विषय पुढील सभेत सादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रवि व्यास अनुमोदक :- श्रीम. प्रतिभा तांगडे-पाटील**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. प्रशांत दळवी, अनुमोदक श्री. हरिश्चंद्र आमगावकर ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) येथील जे.एच. पोद्दार मार्ग नो पार्कींग, नो फेरीवाला म्हणून घोषीत करणेबाबतचा विषय आलेला असून सन २००८ मध्ये याबाबतचा ठराव पारित झाला असून अशा ना फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषीत केलेल्या ठिकाणी आजमितीपर्यंत मोठ्या प्रमाणात फेरीवाले बसत असल्यामुळे त्या फेरीवाल्यांवर कारवाई न झाल्याच्या अनुषंगाने मिरारोड (पूर्व) प्रभाग क्र. ३८ मध्ये सुध्दा सेक्टर क्र. १ व ४ मधील रस्ताही ना फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित केलेला असूनही मा. महासभेपुढे वारंवार याबाबतीत कल्पना देवून सुध्दाही आजमितीपर्यंत प्रभाग कार्यालय क्र.५ मधील प्रभाग अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली दिसून येत नाही. तरी संबंधित प्रभाग अधिकाऱ्याला कार्यवाही न केल्याबद्दल तात्काळ निलंबित करण्यात यावे, अशी सुचना मी मांडत आहे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या श्रीम. मर्लिन डिसा ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

एस. के. स्टोन ते रसाज चौक व एम.टी.एन.एल. रोड नो पार्कींग झोन म्हणून घोषीत करावा.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. हंसुकुमार पांडे ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

जेसलपार्क की इंट्री से शिवसेना शाखा तक ना फेरीवाना झोन घोषीत करे। वहॉ चार स्कुल है, दुसरी तरफ रिक्शा स्टॅन्ड और रेल्वे समांतर सारे फेरीवाले बैठे रहते है।

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

प्रभाग क्र. ३३ मध्ये न्यु सरयु इमारत ते रोहित ते गुलिस्तान पर्यंत ना फेरीवाला क्षेत्र घोषीत करण्यात यावे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या श्रीम. ग्रिटा फॅरो ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

प्रभाग क्र. २३ मध्ये देना बँक गल्लीमध्ये वाहने उभी करु नयेत ही नागरीकांची मागणी आहे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या श्रीम. सुजाता शिंदे ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

हटकेश येथील शांतीविद्यानगरी ते हटकेश्वर महादेव मंदिर चौक ना फेरीवाला क्षेत्र घोषीत करावे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११५, रविवार / सोमवार मार्केट बंद करणेबाबत.

**प्रशांत केळुसकर :-**

मिरा भाईंदर शहर झपाट्याने वाढत असून शहराची लोकसंख्या जवळजवळ १५ लाखाच्या घरात पोहोचलेली आहे. शहराची शहरीकरण झाले असून शहरात विविध प्रकारचे मॉल, डीपार्टमेंटल स्टोर स्थापित झालेले आहेत त्यामुळे शहरवासीयांना आवश्यक असलेल्या दैनंदिन व घरगुती वापरातील सर्व वस्तु रास्त दराने सहज उपलब्ध होत आहेत. मिरा भाईंदर क्षेत्र पुर्वी ग्रामीण क्षेत्र असल्याकारणाने आठवड्याचा बाजार रविवार/सोमवार यारित्या सुरु होते. शहरीकरणामुळे लोकवस्तीत व वाहतुकीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. सदर आठवडा बाजारामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून वाहतुकीची कोंडी होत आहे तसेच रहदारीस

मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत आहे. सदर बाजाराच्या गर्दीमुळे चैन स्नॅचिंग, पाकीटमार, महिला व मुलींची छेडछाड इ. गैरप्रकार घडत आहेत.

याकरीता रविवार आठवड्याच्या बाजारात बसणारे "स्थानिक मच्छी विक्रेते, स्थानिक दैनंदिन व घरगुती वापरातील खाद्यपदार्थ, भाजीपाला इ." विक्री करणा-यांना वगळून इतर लोकांना उठविण्यात यावे व सदरचा बाजार नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाच्या रस्त्यावरील एका बाजुस वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेवून सदरचा बाजार स्थलांतरीत करण्यात यावा व सोमवारचा आठवडा बाजार बंद करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुमन कोठारी :-**

माझे अनुमोदन आहे.

**हेलन गोविंद :-**

सन्मा. महापौर मॅडम, आता मच्छी मार्केट बंद करणार ते कुठल्या सुकलेल्या मासळीचा की ओल्या मासळीचा.

**मा. महापौर :-**

मच्छी मार्केट आपण बंद केली नाहीत. आपले जे स्थानिक विक्रेता आहेत त्यांनाही अलाऊड आहे फक्त ते सुभाषचंद्र बोस रोडवर बसायचे त्यांना सगळ्यांचा रविवार बाजार चालु आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर मनपा हद्दीत मोठ्याप्रमाणा मध्ये शेतकरी, शिलोत्री व मासेमारी करणारे स्थानीक भूमीपूत्र राहतात. पूर्वपारकाळापासून भाईंदर (प.) मुर्धा, राई, मोर्वा, डोंगरी, तारोडी उत्तन, पाली, चौक या गांवांमध्ये राहणारे स्थानिक नागरीक आपले उत्पादन केलेली साहित्य, वस्तु ई. विकण्यासाठी भाईंदर (प.) येथे दर रविवारी येतात. या बाजाराला "रविवारचा बाजार, आठवड्याचा बाजार (Weekly Market)" म्हणून आजही बोलले जाते. दर रविवारी भाईंदर (प.) पोलीस ठाणे ते बेकरी गल्ली नाका तसेच भाईंदर पोलिस ठाणे ते कदमगिरी बिल्डींग (जुनी देना बॅक) पर्यंत बाजार लागत असे. मात्र बाजार फी वसूली करणा-या ठेकेदारांना हेतुपुरस्पर मिरा-भाईंदरच्या बाहेरच्या फेरीवाल्यांनी गर्दी करण्यास सुरुवात केली आहे व रविवारच्या बाजार हा सध्या 'बॉम्बे मार्केट बिल्डींग पर्यंत' तसेच पोलीस स्टेशनच्या समोर 'पोस्ट ऑफीस पर्यंत' लागते त्यामूळे रहिवाश्यांना रहदारीस तसेच वाहतूकीस अडथळा निर्माण होत आहे.

मा. महासभा दि. १९/०७/२००८ ठराव क्र २९ अन्वये मिरा-भाईंदर शहरातील **"फेरीवाला क्षेत्र"** व **"ना फेरीवाला क्षेत्र"** निश्चित करण्यात आलेली आहे.

"रविवारचा बाजार, आठवड्याच्या बाजार" आजही स्थानीक गावकरी, शेतकरी, शिलोत्री व कोळी समाज खरेदी- विक्री करण्यासाठी आठवड्यात एकच दिवस भाईंदर येथे येतात. मिरा-भाईंदर शहरां मध्ये इमारतींची बांधकाम सुरु असल्याने कामगार वर्ग, दिहाडी मजदूर, मोलमजूरी करणारे यांना दर शनिवारी किंवा रविवारी सकाळी ९ वाजता खर्ची म्हणून मालकांकडुन त्यांचा पगारातील किंवा अंगावर घेतलेल्या कामाचा पार्ट-पेमेंट दिली जाते. त्यापासून सामान्य माणूस रविवारचा बाजारात ७ दिवसांची जिवन आवश्यक वस्तु खरेदी करतो. सामान्य माणूस रविवारचा बाजारातील वस्तु स्वस्त दरात मिळत असल्याने टोपली घेऊन कुटूंबासह खरेदी करतो.

तरी भाईंदर (प.) च्या रविवारचा बाजार पूर्वपार काळापासून असल्याने भाईंदर पोलिस ठाणे ते कदमगिरी बिल्डींग (जूनी देना बॅक पर्यंत) व बेकरी गल्लीचा नाक्या पर्यंत होता व तो तसेच ठेवावा. सोमवार व इतर हप्तावारी बाजार शहराच्या कोणत्याही रस्त्यावर भरवण्यास देवू नये व अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करावी. दैनंदिन रस्त्यावर बसणा-या फेरीवाल्यांना महानगरपालिकेच्या न विकसीत झालेल्या आरक्षणामध्ये स्थलांतरीत करावे.

केंद्रशासनाचे सन-२००९ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने घोषीत केलेल्या राष्ट्रीय फेरीवाला धोरणाच्या अनुषंगाने २०१२ च्या लोकसभेमध्ये प्रस्तावित कायद्याचे विधेयक मंजूर झालेले आहे. तरी मिरा-भाईंदर या शहरामध्ये या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करावी, असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत केळुसकर :-**

ध्रुवकिशोर साहेब आपल्या मी निदर्शनास आणतो की आपण स्थानिक लोकांना आणि स्थानिक जे आपले विक्रेते आहेत त्यांनाच फक्त बाजारामध्ये बसायची परवानगी देत असून आपल्या या रोडला रहदारी वाढली आहे. त्यामुळे तो फक्त बाजार स्थलांतरीत करावा. सुभाषचंद्र मैदान या इथे स्थलांतरीत करण्याचा आपण ठराव मांडलेला आहे. माझे आपणांस निवेदन आहे की आपण आपल्या इकडचे सर्व स्थानिक शेतकरी, शिलोत्री, कोळी बांधव त्याचप्रकारे रोजच्या रोज जे घरात सामान बनवतात आणि विक्री करतात अशा स्थानिक लोकांना आपण तो बाजार देतोय. फक्त रहदारीस अडचण येऊ नये म्हणून तो आपण सुभाषचंद्र मैदान या रोडवर घेत आहोत एवढेच बाकीचे बाजार बाहेरनं येणाऱ्या सर्वांना बंद करावे असा मी ठराव मांडलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमच म्हणणं बरोबर आहे ऐकुन घ्या विषय असा आहे की भाईंदर (प.) जो आपला १५० फुट रोड आहे तिकडनं रविवारी भरपूर गाड्या, एस्सल वर्ल्डला उत्तनला जातात. आपण जर बाजार तिकडे शिफ्ट केला तर आणखी जबरदस्त ट्रॅफिक जाम होईल आणि त्याच्यामुळे आणखी त्रास होईल. म्हणजे आपण त्रास कमी करायला जाऊ वेगळा आणि त्रास होईल दुसरा वेगळा, तो रोड छोटा आहे. आणि तुम्ही बघा संध्याकाळी किंवा सकाळी हजारो वाहने तिथून जातात आणि त्याच्यामुळे राई, मुर्धा, उत्तनला तो एकच रस्ता असल्यामुळे आणखी त्रास होईल सिटीमध्ये त्याचा इफेक्ट होईल हा बाहेरच्या बाहेर बायपास केला आहे. तुम्ही जो ठराव मांडला आहे साहेब ठराव खरोखर चुकीचा आहे.

**प्रशांत केळुसकर :-**

डबल रस्ता आहे तो.

**भगवती शर्मा :-**

साहेब तुम्ही प्रॅक्टीकल जाऊन बघा.

**प्रशांत केळुसकर :-**

तस ठरावामध्ये आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, विषय कसा होता देना बँक जुनी किंवा बेकरी गल्लीपर्यंत जुने जे कोळीबांधव गावावरुन यायचे विकायचे तर तिथे आपली जागा त्यांची कायम आहे. ते तिथेच बसतात. तुम्ही ते सुभाषचंद्र बोस मैदानावर स्थलांतरीत केल्यानंतर त्याच्यावरचा जो कंट्रोल आहे तो तुमच्याकडे राहणार नाही. कारण जागा हस्तांतर झाली की बाहेरचे फेरिवाले येणारच जुनी जागा जिथे होती जिथे बाजार लागायचा तिथे निश्चित केली ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रशांतजी महापौर मॅडम विषय असा आहे की तिथे सुभाषचंद्र बोस मैदान आहे. त्या मैदानावरती क्रिकेटचे मॅचेस आणि भरपूर खेळाडू तिथे खेळायला येतात. त्यांच्या गाड्या असतात आणि त्या गाड्या ते रस्त्यावरती पार्किंग करतात. उद्या जर आपण त्या एकच रस्त्यावर जर दोन्ही कडच्या वाहनांना मंजुरी दिली तर भविष्यात खूप त्रास होणार आहे. इम्पॉसिबल आहे.

**हेलन गोविंद :-**

सन्मा. महापौर मॅडम, डी.पी. प्लान पास करुन तुम्ही मार्केट बनवा ना. नंतर तिथुन उठवण्याचा प्रयत्न करा. कारण आता त्रास होणार एवढ्या लोकांना सांगायला कोण जाणार?

**भगवती शर्मा :-**

मेरा आपसे एक रिक्वेस्ट है की उनकी भी यह भावना है की, कोई भी मार्केटवाले की रोजी रोटी पे लाथ नही मारना चाहिए जो रस्ता उन्होंने अभी वहाँ पे बताया नेताजी सुभाषचंद्र बोस का प्रॅक्टिकली कोई भी आप भी अगर जाकर देखेंगे तो आप भी यह बोलेंगे क्योंकी वहाँ पे देखते है दिन की तो बात जाने दिजीए। शाम के अंदर में ऐसी स्थिती रहती ह २०० फिट पे ट्रॅफिक आ जाता है और वो रस्ते में वहाँ पे लोग भी आते जाते है ऐसी परिस्थिती वहाँ पे निर्माण होएगी जो इससे भयंकर बिकट होगी। तो इसलिए हमारा यह कहना है सत्तापक्ष वालो को भी की जबतक कोई पर्याय इससे अच्छी जगह न मिल जाए तब तक यह सन्डे बाजार यहाँ पे चालु रहना चाहिए। उसके बाद में यहाँ के लोगो को विश्वास में लेके जो उनको अच्छी जगह नजर आए उसके उपर फिर विचारविनिमय किया जाए।

**शरद पाटील :-**

भगवतीजी मी बोललो ना आपल्याला पर्याय मिळाल्यानंतरच आपण शिफ्टींग करणार आहोत आणि तो पर्याय नक्की झाला मग शिफ्टींग करणार. तोपर्यंत इथेच राहणार आहे.

**हेलन गोविंद :-**

साहेब १५० वर्ष झाले लोक तिथे मच्छी मार्केटसाठी, बाजारासाठी येतात. गोरगरिब बाया तिथे त्यांची रोजीरोटीसाठी येतात आणि तुम्ही अस कस करतात.

**भगवती शर्मा :-**

नेताजी सुभाष मैदान बोल रहे है आप उसे कॅन्सल कर दो।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रशांतजी विषय असा आहे तुम्ही गोषवारा दिला पाहिजे ना. तुम्ही गोषवारा दिलाच नाही फक्त विषय दिला. प्रशासनाची पण काही भूमिका कळत नाही आणि तुमची पण भूमिका कळाली नाही आम्हाला.

**मा. महापौर :-**

आप ठराव से सहमत है या अलग ठराव मांडना है। आप सहमत है इस बात से की क्लब ..........

**भगवती शर्मा :-**

मॅडम अगर हमारा ठराव हमने जैसे बताया और हमारे ठराव में भी है की पर्याय जगह इसमें लिखा हुआ भी है। पर्याय जगह वगैरे दोनो को क्लब करलो खत्म हो गया।

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ठराव क्लब करायचा आहे ना...........

**नगरसचिव :-**

नाही ते होत नाही. दोन्ही वेगळे आहेत.

**मा. महापौर :-**

मतदानाला घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११५ करिता २ ठराव आलेले आहेत. पहिला ठराव श्री. प्रशांत केळुसकर, दुसरा ठराव श्री. ध्रुवकिशोर पाटील. श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजुने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहे. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सूचक श्री. प्रशांत केळुसकर यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ३६, विरोधात २९ इतकी मते पडली आहेत. श्री. प्रशांत केळुसकर यांचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ११५ :-**

रविवार / सोमवार मार्केट बंद करणेबाबत.

**ठराव क्र. ८६ :-**

मिरा भाईंदर शहर झपाट्याने वाढत असून शहराची लोकसंख्या जवळजवळ १५ लाखाच्या घरात पोहोचलेली आहे. शहराची शहरीकरण झाले असून शहरात विविध प्रकारचे मॉल, डीपार्टमेंटल स्टोर स्थापित झालेले आहेत त्यामुळे शहरवासीयांना आवश्यक असलेल्या दैनंदिन व घरगुती वापरातील सर्व वस्तु रास्त दराने सहज उपलब्ध होत आहेत. मिरा भाईंदर क्षेत्र पुर्वी ग्रामीण क्षेत्र असल्याकारणाने आठवड्याचा बाजार रविवार/सोमवार यारित्या सुरु होते. शहरीकरणामुळे लोकवस्तीत व वाहतुकीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. सदर आठवडा बाजारामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून वाहतुकीची कोंडी होत आहे तसेच रहदारीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत आहे. सदर बाजाराच्या गर्दीमुळे चैन स्नॅचिंग, पाकीटमार, महिला व मुलींची छेडछाड इ. गैरप्रकार घडत आहेत.

याकरीता रविवार आठवड्याच्या बाजारात बसणारे "स्थानिक मच्छी विक्रेते, स्थानिक दैनंदिन व घरगुती वापरातील खाद्यपदार्थ, भाजीपाला इ." विक्री करणाऱ्यांना वगळून इतर लोकांना उठविण्यात यावे व सदरचा बाजार नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाच्या रस्त्यावरील एका बाजुस वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेवून सदरचा बाजार स्थलांतरीत करण्यात यावा व सोमवारचा आठवडा बाजार बंद करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदक :- श्रीम. सुमन कोठारी**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शरद केशव पाटील | १ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| २ | कोठारी सुमन रमेश | २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३ | सिमा कमलेश शहा | ३ | ध्रुवकिशोर पाटील | |
| ४ | जैन गिता भरत | ४ | डिमेलो बर्नड अल्बर्ट | |
| ५ | अरोरा दिपीका पंकज | ५ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ६ | रावल भगवती जयशंकर | ६ | शिल्पा भावसार | |
| ७ | मेहता डिंपल विनोद | ७ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ८ | मेघना दिपक रावल | ८ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ९ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ९ | पाटील वंदना विकास | **निरंक** |
| १० | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १० | प्रभात प्रकाश पाटील | |
| ११ | सुजाता रविकांत शिंदे | ११ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १२ | पाटील प्रेमनाथ गजानन | १२ | पुजारी कांचना शेखर | |
| १३ | सिंग मदन उदितनारायण | १३ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १४ | कांगणे यशवंत ठकाजी | १४ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १५ | अनिल बाबुराव भोसले | १५ | वंदना रामदास चक्रे | |
| १६ | कासोदरीया अश्विन श्यामजी | १६ | अनिता जयवंत पाटील | |
| १७ | जैन दिनेश तेजराज | १७ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १८ | जैन रमेश धरमचंद | १८ | काझी रशीदा जमील | |
| १९ | निलम हरिश्चंद्र ढवण | १९ | बगाजी शर्मिला विल्सन | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | तारा विनायक घरत | २० | इनामदार जुबेर | |
| २१ | शुभांगी महिन कोटियन | २१ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २२ | जयमाला किशोर पाटील | २२ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २३ | परमार अनिता भरत | २३ | सामंत प्रमोद जयराम | |
| २४ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | २४ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २५ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | २५ | खण्डेलवाल सुरेश | |
| २६ | प्रविण मोरेश्वर पाटील | २६ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| २७ | शाह राकेश रतिशचंद्र | २७ | डॉ. आसिफ शेख | |
| २८ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | २८ | भोईर कमलेश यशवंत | |
| २९ | केळुसकर प्रशांत नारायण | २९ | रविंद्र भिमदेव माळी | |
| ३० | भोईर भावना राजू | | | |
| ३१ | भोईर राजू यशवंत | | | |
| ३२ | जाधव मोहन महादेव | | | |
| ३३ | मुन्ना सिंग | | | |
| ३४ | ॲड. रवि व्यास | | | |
| ३५ | दिप्ती शेखर भट | | | |
| ३६ | मयेकर सरस्वती रजनीकांत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११६, मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागातील काळजीवाहक यांचे वेतन काळजीवाहकाचे मानधन अंध व अपंग कल्याण योजने लेखाशिर्षातुन अदा करण्याबाबत.

**शरद पाटील :-**

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागामधील सर्व शिक्षण अभियान अंतर्गत मनपा शाळेमध्ये अपंग विशेष गरजाधारक विदयार्थ्यांची (अपंग मुलांची) काळजी घेण्यासाठी ६ काळजीवाहक नेमण्यात आले होते. परंतु महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद येथे झालेल्या दि.०८/०४/२०१५ रोजीच्या झालेल्या समावेशित शिक्षण समन्वयकाच्या बैठकीमध्ये शासनाकडुन सन २०१५-१६ या वर्षासाठी काळजीवाहक यांच्या मानधनासाठी निधी मंजुर करण्यात आलेला नाही. त्या अन्वये शिक्षण विभागाने सदर काळजीवाहक यांची बैठक घेवुन काळजीवाहन यांना कार्यमुक्त करण्यात आलेले आहे.

तरी विशेष गरजाधारक विदयार्थ्यांची काळजी घेणे अत्यावश्यक आहे व तसेच विशेष गरजाधारक विदयार्थ्यांची गरज लक्षात घेता खालील काळजीवाहकांची सदर मनपा शाळेमध्ये आवश्यकता आहे.

| अ.क्र. | नाव | पद | प्रति माह मानधन |
|---|---|---|---|
| १ | श्रीम. मेघा सावळकर | काळजीवाहक | ४०००/- |
| २ | श्रीम. सायली चव्हाण | काळजीवाहक | ४०००/- |
| ३ | श्रीम. दिपा भोईर | काळजीवाहक | ४०००/- |
| ४ | श्रीम. गुलाब दिवेकर | काळजीवाहक | ४०००/- |
| ५ | श्रीम. सुनिता गोसावी | काळजीवाहक | ४०००/- |
| ६ | श्रीम. राजश्री शर्मा | काळजीवाहक | ४०००/- |

तरी वरील प्रमाणे सर्व काळजीवाहकांचे माहे-एप्रिल २०१५ पासुन ठोक मानधनावर दरमहा वेतन अंध व अपंग कल्याण योजनेच्या "अपंग व मतिमंद मुलांसाठी शासकीय व निमशासकीय हॉस्पिटल मधुन Therapy /शिक्षणासाठी आर्थिक मदत" या लेखाशिर्षातुन अदा करणेस धोरणात्मक निर्णय घेत आहे. सदर योजनेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**अनिल भोसले :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

पहिल्यांदा तर आपले खुप-खुप आभार आणि आता असलेले आयुक्त आणि तत्कालीन उपायुक्त यांचे सुध्दा मी खुप आभार मानते. कारण जुनमध्ये ज्या शाळा सुरु झाल्या तेव्हा शाळा सुरु होण्याच्या १५ दिवस अगोदर या शिक्षकांना नोटिसा गेल्या की, तुम्हाला आम्ही कमी केले आहे. आणि त्यानंतर या लोकांनी काय करायचे म्हणून आपल्या प्रशासनाची खूप दरवाजे ठोठावले आयुक्त साहेब इथे नाहीत पण मी त्यांचेसुध्दा खुप-खुप आभार मानते कारण त्यांनी हा प्रश्न मला वाटते मुरकुटे साहेब आणि पानपट्टे साहेब यांना जबरदस्ती

केली की तुम्ही त्यांच्या विभागातर्फे का होईना पण यांचा पगार काढला पाहिजे कारण हे काळजीवाहक आणि आपल्याला विनंती आहे मॅडम आपल्या शासनाचे धोरण असे आहे की, सर्वसामान्य मुलांबरोबर अंध आणि अपंगांना शिक्षण दिले जावे असे धोरण आहे. आणि अशी मुले शाळेमध्ये आहेत पण केवळ ६ शिक्षक आपल्याकडे नेमणूक झालेली आहे ठीक आहे ६ शाळांमध्ये का होईना काळजीवाहक आहेत त्यांना सुध्दा मध्यंतरी शासनाने त्यांचे अनुदान बंद केले त्यांना नोटिसा दिल्या की तुम्हाला आपण कामावरुन कमी करतोय. तरीसुध्दा हे शिक्षक केवळ हांगे साहेब आणि पानपट्टे साहेब यांनी धीर दिल्यामुळे बिना पगाराचे आजपर्यंत त्यांना पगार नाही. बिना पगाराचे काम करत आहेत. परंतु आज तुमच मी आभार मानते की तुम्ही हा विषय शासनाने तुमच्याकडे दिला आणि तुम्ही तो पटलावर घेतला. निदान आजपासुन त्यांचे बॅक डेटेड पगार पण मिळेल आणि आपल्या ठरावामध्ये बदल केला तर खूप चांगलं होईल की आपण त्यांना ४००० च ठेवले. ४ हजारात काय होते मला कळत नाही. जर सभागृहाची इच्छा असेल तर निदान १००० रुपयांची वाढ त्यांना करावी एवढी मी तुम्हाला विनंती करते. सगळ्या सभागृहाच्या निमित्ताने किमान वेतन सुध्दा यापेक्षा जास्त आहे. माझी विनंती आहे की, नको एवढे किमान वेतन करा परंतु ५००० राऊंड फिगर करावे अशी मी शरद पाटील आणि महापौर मॅडम तुम्हाला विनंती करते.

**मर्लिन डिसा :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलते, प्रभात ताई जे पण बोलतात मी त्यांच्या बरोबर सहमत आहे. आम्ही शिक्षिका आहोत. हे जे स्पेशल केअर टेकर आहेत. स्पेशली चिल्ड्रनसाठी कालच आपण स्पेशल ॲबिलीटीज ऑब्झर्व केल्या आणि यांच्यासाठी मिनिमम वेजेस स्थायी समितीमध्ये पण एक वृत्तांत आले होते. एल.बी.टी. चे नोकर्स त्यांना पण ६५०० रु. ठेवले. मॅडम ते पण ग्रॅज्युएट आहेत. शासनाच्या निर्णयाप्रमाणे तुम्ही थोडी वाढ करुन द्या.

**भगवती शर्मा :-**

मैं जानकारी चाहता हूँ प्रशासन के माध्यम से यह जो अंध अपंग के लिए इनको जो भी वेतन बढाना है। लेकिन यह कहाँ का जो मिरा भाईंदर की स्कूल है, यहाँ पे कहाँ-कहाँ पे कितनी क्लास चालु है उसमें कितने बच्चे है। दुसरी बात वहाँ पे उनको क्या शिक्षा दी जाती है की खाली देखभाल की जाती है।

**मा. महापौर :-**

भगवतीजी इसमें शब्द (स्पष्ट) लिखा है केअर टेकर, काळजीवाहक वो उनके लिए टिचर्स अलग है। अपनी सरल शिक्षा अभियान की तरफ यह केअर टेकर हमारा यहाँ पे थे। जिनको अभी तक का यह जो भी आप अनुदान बोलते है, उनको वहाँ से मिलता था। वहाँ से जिन जिनको नोटिस आई की हम यहाँ नही देंगे तो उन अपंग बच्चो के लिए जो केअर टेकर है उनके लिए हम यहाँ से अपनी तरफ से पगार दे रहे है।

**भगवती शर्मा :-**

वो सिफ केअर टेकर है क्या यह पूछना चाहता हूँ। उनको शिक्षा नही दी जाती है क्या वहॉ पे?

**मा. महापौर :-**

शिक्षा नही दी जाती। केअर टेकर काळजीवाहक.

**भगवती शर्मा :-**

दुसरा मेरा प्रश्न था वहाँ पे कितने बच्चे है।

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

मनपा शाळा क्र. ४ काशी मराठी, मनपा शाळा क्र. ८ गोडदेव मराठी, मनपा शाळा क्र. २२ मुर्धा मराठी, मनपा शाळा क्र. १३ नवघर मराठी, मनपा शाळा क्र. ९ घोडबंदर मराठी, मनपा शाळा क्र. ६ खारी मराठी या ठिकाणी.

**भगवती शर्मा :-**

कितने बच्चे है?

**प्रभात पाटील :-**

एक बात में बोलती हूँ, आपको पूरे स्कूल के बच्चे जितने भी अपंग बच्चे है उनको खिलाना उनको टॉयलेट तक लेके जाना।

**संभाजी पानपट्टे (मा. आयुक्त) :-**

टोटल १,४१६ बच्चे है।

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर आणि जसं तुम्ही सांगितल कायद्यात बसत असेल तर आपण नक्कीच त्यांना पगार वाढवू.

**अनिल भोसले :-**

महापौर मॅडम, त्या टिचर्स लोकांचा आपण जो विषय घेतला खास करुन त्या टिचर्स फार परेशान होत्या. जस प्रभात ताई बोलल्या ती आपणाला या महासभेला विनंती करतो. हे जे टिचर्स आहेत त्यांनी खरोखरच खूप चांगल काम करतात त्यासाठी सर्वांचं सभागृहाच धन्यवाद देण्यासाठी मी उभा राहिलो. खरोखर चांगला विषय घेतल्याबद्दल धन्यवाद.

**प्रकरण क्र. ११६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागातील काळजीवाहक यांचे वेतन काळजीवाहकाचे मानधन अंध व अपंग कल्याण योजने लेखाशिर्षातुन अदा करण्याबाबत.

**ठराव क्र. ८७ :-**

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागामधील सर्व शिक्षण अभियान अंतर्गत मनपा शाळेमध्ये अपंग विशेष गरजाधारक विदयार्थ्यांची (अपंग मुलांची) काळजी घेण्यासाठी ६ काळजीवाहक नेमण्यात आले होते. परंतु महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद येथे झालेल्या दि.०८/०४/२०१५ रोजीच्या झालेल्या समावेशित शिक्षण समन्वयकाच्या बैठकीमध्ये शासनाकडुन सन २०१५-१६ या वर्षासाठी काळजीवाहक यांच्या मानधनासाठी निधी मंजुर करण्यात आलेला नाही. त्या अन्वये शिक्षण विभागाने सदर काळजीवाहक यांची बैठक घेवुन काळजीवाहन यांना कार्यमुक्त करण्यात आलेले आहे.

तरी विशेष गरजाधारक विदयार्थ्यांची काळजी घेणे अत्यावश्यक आहे व तसेच विशेष गरजाधारक विदयार्थ्यांची गरज लक्षात घेता खालील काळजीवाहकांची सदर मनपा शाळेमध्ये आवश्यकता आहे.

| अ.क्र. | नाव | पद | प्रति माह मानधन |
|---|---|---|---|
| १ | श्रीम. मेघा सावळकर | काळजीवाहक | ४०००/- |
| २ | श्रीम. सायली चव्हाण | काळजीवाहक | ४०००/- |
| ३ | श्रीम. दिपा भोईर | काळजीवाहक | ४०००/- |
| ४ | श्रीम. गुलाब दिवेकर | काळजीवाहक | ४०००/- |
| ५ | श्रीम. सुनिता गोसावी | काळजीवाहक | ४०००/- |
| ६ | श्रीम. राजश्री शर्मा | काळजीवाहक | ४०००/- |

तरी वरील प्रमाणे सर्व काळजीवाहकांचे माहे-एप्रिल २०१५ पासुन ठोक मानधनावर दरमहा वेतन अंध व अपंग कल्याण योजनेच्या "अपंग व मतिमंद मुलांसाठी शासकीय व निमशासकीय हॉस्पिटल मधुन Therapy /शिक्षणासाठी आर्थिक मदत" या लेखाशिर्षातुन अदा करणेस धोरणात्मक निर्णय घेत आहे. सदर योजनेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदक :- श्री. अनिल भोसले**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रशांत केळुसकर :-**

मी एक ठराव मांडत आहे. आज दि. ०४/१२/२०१५ रोजीची ही सभा तहकूब करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**राकेश शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**सभा तहकुबी ठराव क्र. ८८ :-**

आज दि. ०४/१२/२०१५ रोजीची सभा तहकुब करण्यात येत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर** **अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(सभा संपण्याची वेळ दु.  वाजता.)**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**



नगरसचिव

मिरा भाईंदर महानगरपालिका